डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजगृह
अमरावती महानगरपालिका, अमरावती
प्रकाश विभाग

डा. बाबासाहेब आंबेडकर समाजगृह
अमरावती महानगरपालिका, अमरावती
प्रकाश विभाग
अमृत महोत्सव २०२१

डा. बाबासाहेब आंबेडकर समाजगृह
अमरावती महानगरपालिका, अमरावती
प्रकाश विभाग
अमृत महोत्सव २०२१

अमरावती महानगरपालिका
विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
प्रकाश विभागाने केला साजरा

दि. २२/१२/२०२१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी कार्यक्रम महानगरपालिकेच्या प्रकाश विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला. प्रदीप भगत यांच्या देशभक्तीपर सुरेल गायनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. नामवंत मराठी साहित्यिक विष्णू सोळंके यांनी देशभक्तीपर आणि सामाजिक कविता सादर केल्या.

राष्ट्रीय स्तरावर आपली कविता गाजविणारे मनोज मद्रासी, हनुमान गुजर, प्रीतम जौनपुरी ह्या प्रख्यात कवींनी आपल्या हिंदी रचना सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. विभागातील शेखर सोनकांबळे यांनी आपली रचना सादर केली. उपआयुक्त नरेंद्र वानखडे व योगेश पखाले यांनीही वीररसयुक्त गीते सादर करून वातावरण देशभक्तीमय केले. वीजतज्ज्ञ सुधाकर वानखडे यांनी विजेची उपयुक्तता व दक्षता यावर उद्बोधन केले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. रत्नदीप वानखडे यांनी तर आभार जनसंपर्क अधिकारी भूषण पुसतकर यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागप्रमुख शरद तिनखेडे, आकाश तिरथकर, दिलीप गाढवे, धीरज पार्शिवकर, कल्पना मावदे, दामोधर मुधोळकर आदींनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमात वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. सिमा नैताम, कार्यालय अधिक्षक प्रतिभा घंटेवार, कमलाकर जोशी, स्वच्छ भारत अभियान अमरावती शहर समन्वयक डॉ.श्वेता बोके, अश्विनी लोंदे, अर्शद जावेद, शुभम जावरे, विशाल चव्हाण, अभय जवंजाळ, बाळू काशीकर, जसवंतसिंह शेखावत, गणेश लोयबरे, पंकज वाघ, उमेश पोफळे, दिलीप नांदुरकर, अहफाज अहेमद, गजानन निंभोरकर, नीरज दासवत, रवींद्र गणवीर,

नंदन लोयबरे, अमोल साकुरे, अजय चव्हाण, रंगा धुर्वे, राजकुमारी चव्हाण, अनिता सावलकर, सुनीता कोकाटे, चंद्रकांत लोखंडे आदी अनेक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नेहमी कचरा दिसणाऱ्या ठिकाणाचे वृक्ष लावून सौंदर्यीकरण करण्यात आले.

उड्डाणपुलांची साफसफाई

व्यावसायिक क्षेत्रात रात्रकालीन साफसफाई

Amravati
Maharashtra
India
27°C
81°F
2021-12-15(Wed) 04:51(PM)

प्लास्टिक बंदी

Amravati
Maharashtra
India
27°C
81°F

Amravati
Maharashtra
India

Amravati
Maharashtra
India
27°C
81°F

स्वच्छता अभियान

दिनांक १८/१२/२०२१ रोजी मनपा उर्दू हाई स्कूल, जमील कॉलनी या शाळेत “आझादी का अमृत महोत्सव” निमित्त ऊर्जा संवर्धन अंतर्गत निबंध स्पर्धा, नाट्य स्पर्धा व प्रश्न मंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या व शिक्षणाधिकारी डॉ.अब्दुल राजीक यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

“आझादी का अमृत महोत्सव” निमित्त गणीतोत्सव मनपा उच्च प्राथिमक शाळा क्रं.१५, कृष्णानगर या शाळेत साजरा करण्यात आला.

अमरावती महानगरपालिका, अमरावती

अमरावती महानगरपालिका, अमरावती

आझादी का अमृत महोत्सव : आढावा बैठक

अमरावती प्रतिनिधी,

भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त आझादी का अमृत महोत्सव हा उपक्रम देशातील सर्व राज्यात व केंद्रशासित प्रदेशात राबविण्यात येत आहे.

स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त आझादी का अमृत महोत्सव या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत शहरात विविध कार्यक्रमांच्या आयोजनास सुरुवात झालेली आहे त्या अनुषंगाने मा.महापौर चेतन गावंडे व मनपा आयुक्त प्रशांत रोडे यांच्या उपस्थितीत शुक्रवार दिनांक २४ डिसेंबर,२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता आझादी का अमृत महोत्सव या उपक्रमाच्या आयोजनाबाबत आढावा बैठक मनपा कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत आझादी का अमृत महोत्सव या उपक्रमाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. देशाच्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त केंद्र शासनाने सुचित केल्यानुसार १५ ऑगस्ट,२०२२ पर्यंत आझादी का अमृत महोत्सव या उपक्रमांचे आयोजन सर्व विभागप्रमुखांनी करावे असे निर्देश या बैठकीत देण्यात आल्या.

या बैठकीत आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत १ जानेवारी,२०२२ रोजी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच विभागप्रमुखाने आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे असे निर्देश महापौरांनी या बैठकीत दिले. या बैठकीत आतापर्यंत झालेल्या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. अमरावतीचा इतिहास हे पुस्तक डिजीटल स्वरुपात प्रसिध्द करण्याचे या बैठकीत ठरविण्यात आले. स्वच्छता विभागामार्फत रक्तदान शिबीर घेण्यात येणार आहे. शिक्षण विभागामार्फत भव्य चित्रकला स्पर्धा घेण्याचे ठरविण्यात आले. महापौर चेतन गांवडे यांनी यावेळी सुचना केली की आझादी का अमृत महोत्सवा अंतर्गत आतापर्यत जेवढे महापौर झालेले आहे त्यांचे चर्चा सत्र आयोजित करावे. वरीष्ठ नागरिकांचे फेसबुक लाईव्ह कार्यक्रम घेण्याचे यावेळी ठरविण्यात आले. अमृत महोत्सवानिमीत्य दर्शनी भागात होर्डीग लावावे. जो

विभाग सर्वात चांगला कार्यक्रम घेईल त्यांची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात येईल व त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. स्वच्छता विभागामार्फत स्वच्छता अभियान राबवून त्यांत नागरिकांचा सहभाग घ्यावा. आरोग्य विभागामार्फत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात येत आहे. शहरातील हेरीटेज वास्तुंना भेटी देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

या बैठकीत उपमहापौर कुसुम साहु, नगरसेवक सुनिल काळे, नगरसेविका पद्मजा कौंडण्य, उपआयुक्त सुरेश पाटील, मुख्यलेखाधिकारी हेमंत ठाकरे, सहाय्यक संचालक नगर रचना आशिष उईके, पर्यावरण संवर्धन अधिकारी महेश देशमुख, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त योगेश पिठे, भाग्यश्री बोरेकर, तौसिफ काझी, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.सिमा नैताम, नगरसचिव मदन तांबेकर, शिक्षणाधिकारी डॉ.अब्दुल राजीक, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, समाज विकास अधिकारी धनंजय शिंदे, अग्निशमन अधिक्षक अजय पंधरे, बाजार व परवाना अधिक्षक उदय चव्हाण, अभियंता लक्ष्मण पावडे, एन.यु.एल.एम. व्यवस्थापक भूषण बाळे व प्रफुल ठाकरे उपस्थित होते.

अमृत महोत्सव

अमरावती महानगर पालिका, अमरावती
स्वच्छ
सर्वेक्षण
2022

अमरावती महानगर पालिका, अमरावती
पश्चिम झोन क्र. ५, भाजीबाजार, अमरावती
(ULB Code :- 602490)

होय, आम्हाला माहित आहे,
सेप्टिक टँक आणि भुयारी गटारांची
असुरक्षित सफाई
कल्याण कायदेशीर कारवाई होऊ शकते
24 x 7 हेल्पलाईन नंबर 144 20
असुरक्षित सफाई

स्वच्छ सर्वेक्षण २०२२ व आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत
अमरावती महानगरपालिकेतर्फे रांगोळी स्पर्धेचे आयोजन

अमरावती प्रतिनिधी,

"आझादी का अमृत महोत्सव व स्वच्छ सर्वेक्षण २०२२" च्या अनुषंगाने गुरुवार दिनांक २३/१२/२०२१ रोजी झोन क्र.५ भाजीबाजार येथे रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये प्रमुख अतिथी म्हणून माजी महापौर विलास इंगोले, सहाय्यक आयुक्त तौसिफ काझी, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.सिमा नैताम, मनोज भेले, सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी गणेश तंबोले, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, सुरेश रतावा, गजानन राजगुरे, नंदुभाऊ गुंबळे उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांचे स्वागत करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. सदर स्पर्धेमध्ये २० स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेमध्ये सर्व मान्यवरांनी रांगोळीची पाहणी केली. सदर रांगोळी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक श्री.हितेश लोखंडे, द्वितीय क्रमांक श्रीमती नंदा सोनुने, तृतीय क्रमांक कुमारी प्रिती इंगोले यांना प्रमाणपत्र आणि रोख स्वरूपात बक्षीस वितरीत करण्यात आले तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. यावेळी झोनचे स्वच्छता अँम्बेसिडर माजी महापौर तथा नगरसेवक विलास इंगोले यांचा सन्मान करण्यात आला. तसेच १० नागरिकांना स्वच्छता चॅम्पियन म्हणून प्रमाणपत्र आणि संत गाडगेबाबा यांची प्रतिमा देऊन गौरविण्यात आले.

सदर ठिकाणी ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक विकी जेधे, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी वर्ग तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते.

Decimal
DMS
Latitude
20.862961
20°51'46" N
Longitude
77.734817
77°44'5" E
24°C
75°F
2021-12-21(Tue) 12:33(PM)

सर्वेक्षण
Decimal
DMS
Latitude
20.862952
20°51'46" N
Longitude
77.734871
77°44'5" E
24°C
75°F
2021-12-21(Tue) 01:04(PM)
Google

Decimal
DMS
Latitude
20.86294
20°51'46" N
Longitude
77.734867
77°44'5" E
25°C
77°F
2021-12-21(Tue) 01:53(PM)

अमरावती महानगरपालिकेच्या वतीने आझादी का अमृत महोत्सव व स्वच्छ सर्वेक्षण २०२२ चा उपक्रम साजरा

अमरावती प्रतिनिधी,

संपूर्ण भारतात "आझादी का अमृत महोत्सव" साजरा करण्यात येत असून अमरावती महानगरपालिका मा.आयुक्त महोदय यांच्या आदेशानुसार अमरावती महानगरपालिका अंतर्गत "आझादी का अमृत महोत्सव" व "स्वच्छ सर्वेक्षण २०२२" चा उपक्रम मध्ये नमूद मुद्दे नुसार दिनांक २१/१२/२०२१ रोजी अमरावती महानगरपालिका दक्षिण झोन क्रमांक ४ बडनेरा मधील प्रभाग क्र.१९,२०,२१,२२ द्वारे मनपा शाळा क्र.३ व १० उर्दू माध्यम व मनपा शाळा क्र.७ मराठी माध्यम विद्यार्थी करिता "आझादी का अमृत महोत्सव" व "स्वच्छ सर्वेक्षण २०२२" ची जनजागृती करिता टाकाऊ वस्तू पासून टिकाऊ, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच उत्कृष्टरित्या साफ सफाई चे काम करणारे महिला व पुरुष सफाई कामगार यांचा सत्कार, स्वच्छता बाबत नेहमी क्रियाशील असणाऱ्या नागरिकांचा व समाजातील जेष्ठ नागरिक जे स्वच्छता बाबत सहकार्य करतात स्वच्छता चॅम्पियन श्री कुकडे व विनायक घिमे यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. अमरावती महानगरपालिकेद्वारे आयोजित स्वर्गीय विनायक झामरकर यांचा स्मृती निमित्त व्हॉलीबॉल स्पर्धेत उपविजेता दक्षिण झोन स्वच्छता विभागाचे मनपा सफाई कामगारांचा सत्कार करण्यात आला. या चित्रकला स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना पाहून "तारे जमीन पे" चित्रपट सारख्या प्रसंग निर्माण झाले असता याप्रसंगात मनपाचे शिक्षण समिती सभापती आशिषकुमार गावंडे, नगरसेविका सौ.गंगाताई अंभोरे, दक्षिण झोन क्र.४ सहाय्यक आयुक्त भाग्यश्री बोरेकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.सिमा नैताम, स्वच्छ भारत अभियान अमरावती शहर समन्वयक डॉ.श्वेता बोके यांच्या द्वारे अधिनस्त मान्यवरांच्या हस्ते बुके व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी झोन क्र.४ चे जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजु डिक्याव, स्वास्थ निरीक्षक एकनाथ कुलकर्णी, विनोद

टांक, एस.जे. माहुलकर, श्री.राठोड, श्री.इमरान, मिथुन ऊसरे यांच्या सहित सर्व बिटप्युन विशाल कैथेल, राजू मारवे, राम समुदरे, संजय करिहार, सर्व सफाई कामगार तसेच मनपा शाळा क्रमांक ३, ७ व १० चे सर्व मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वर्ग यांनी आझादी का अमृत महोत्सव व स्वच्छ सर्वेक्षण २०२२ चे कार्यक्रमाला यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता परिश्रम घेतले.

प्रविण नगर अम
स्वच्छ सर्वेक्ष
स्वच्छता विभाग

प्रविण नगर अमरावती

स्वच्छ
भारत

क्लीन
सिटी, ग्रीन सिटी
यही मेरी ड्रीम सिटी

मनपा शाळा क्र.१८ येथे रांगोळी स्पर्धेचे आयोजन

दिनांक २८ डिसेंबर,२०२१

"आझादी का अमृत महोत्सव व स्वच्छ सर्वेक्षण २०२२" च्या अनुषंगाने झोन क्र.१ रामपुरी कॅम्प अंतर्गत म.न.पा.शाळा क्र.१८ मधे स्वच्छ सर्वेक्षण २०२२ च्या अनुषंगाने रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धामध्ये प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक आयुक्त योगेश पिठे, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक व स्वास्थ निरीक्षक, म.न.पा. शाळा क्र.१८ चे मुख्याध्यापिका सौ.वासनिक मॅडम उपस्थित होते. या रांगोळी स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी व आशा वर्कर यांनी स्वच्छता विषयावर आनंद पुर्वक सहभाग घेतला. यावेळी मान्यवरांनी रांगोळी स्पर्धेची पाहणी केली. तसेच स्पर्धामध्ये सहभागी झालेल्या मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना व आशा वर्कर यांना प्रथम, व्दितीय व तृतीय पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आले. सदर अभियानाचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये स्वच्छतेप्रति जनजागृती व्हावी व शहरामधील प्रत्येक नागरिक स्वच्छ भारत अभियानामध्ये सहभागी होऊन अमरावती महानगरपालिकेला सहकार्य करावे.

PETER ENGLAND

आज़ादी का
अमृत महोत्सव
स्वच्छ सर्वेक्षण २०२२

स्वच्छ सर्वेक्षण २०२२

माझी वसुंधरा स्वाक्षरी
Say no to Nylon Manja

अमरावती महानगरपालिका,अमरावती
माझी वसुंधरा स्वाक्षरी अभियान

अमरावती महानगरपालिका, अमरावती

“आझादी का अमृत महोत्सव” अंतर्गत महानगरपालिकेतर्फे भव्य सायकल रॅलीचे आयोजन

अमरावती प्रतिनिधी,

भारतीय स्वातंत्र्याच्या “अमृत महोत्सव” संदर्भात ५२ आठवड्यांच्या कालावधीमध्ये “आझादी का अमृत महोत्सव” साजरा करण्याच्या शासन सुचना तसेच माझी वसुंधरा व स्वच्छ सर्वेक्षण २०२२ च्या अनुषंगाने शनिवार दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी सकाळी ८.०० वाजता नेहरु मैदान, राजकमल चौक, अमरावती येथून सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या भव्य सायकल रॅलीमध्ये महापौर चेतन गावंडे, सभागृह नेता तुषार भारतीय, गटनेता चेतन पवार, नगरसेवक संजय नरवणे, अजय सारसकर, आशिष अतकरे, नगरसेविका संध्या टिकले, सुरेखा लुंगारे, पद्मजा कौंडण्य, लविणा हर्षे, जयश्री कु-हेकर, उपआयुक्त नरेंद्र वानखडे, पर्यावरण संवर्धन अधिकारी महेश देशमुख, सहाय्यक आयुक्त योगेश पिठे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.सिमा नैताम, शिक्षणाधिकारी डॉ.अब्दुल राजीक, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, समाज विकास अधिकारी धनंजय शिंदे, बाजार व परवाना अधिक्षक उदय चव्हाण, डॉ.जयश्री नांदुरकर, स्वच्छ भारत अभियान अमरावती शहर समन्वयक डॉ.श्वेता बोके, सन्मा.पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक, सन्मा.नगरसेविका, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सायकल रॅलीची सुरुवात अमरावती शहरातील प्रसिध्द नेहरु मैदान येथुन झाली. राजकमल चौक मार्गक्रमण करत अमरावती शहराची हेरिटेज वास्तु परकोट येथे भेट देण्यात आली. त्यानंतर इतवारा मार्गक्रमण करत महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळयाला हारार्पण करुन जयस्तंभ चौक मार्ग महात्मा गांधी यांच्या पुतळयाला हारार्पण करण्यात आले. जयस्तंभ चौकातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक (इर्विन चौक) येथे

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाला हारार्पण करुन बस स्टँड मार्गे अमरावती शहरातील प्रसिध्द पर्यटन स्थळ शिवटेकडी येथे रॅलीचा समारोप करण्यात आले.

माझी वसुंधरा या उपक्रमाअंतर्गत शिवटेकडी येथे स्वाक्षरी अभियान व हरीत शपथ घेण्यात आली. नायलॉन मांजाचा वापर करु नये यासाठी स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२२ अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सभागृह नेता तुषार भारतीय यांनी सांगीतले की, सदर मोहीम राबविल्यामुळे आनंद झाला आहे. मनपा शहराचे हृदयस्थान असून हृदयस्थानी असणा-या संस्थेने सदर उपक्रम राबविल्यामुळे अत्युच्य आनंद होत आहे. महानगरपालिकेने खुप चांगला निर्णय घेतलेला आहे. यावेळी सर्वांना नविन वर्षाच्या हार्दीक शुभेच्छा दिल्या.

महापौर चेतन गावंडे यांनी सांगीतले की, सायकल चालविल्याने सकारात्मक ऊर्जा मिळते. येणा-या काळात सदर अभियानाला गती देण्यात येईल. अमरावतीकर नागरिकांनी या अभियानासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. पर्यावरण संवर्धनासाठी सर्व सामाजिक संस्थेने अमरावती शहरात विविध उपक्रम राबवावे. अमरावती शहरातील इतर विभागाने सदर अभियानामध्ये सहभाग घेणे अपेक्षित आहे. अमरावती शहराला स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी प्रत्येकाने आपला सहभाग नोंदवणे गरजेचे आहे. आझादी का अमृत महोत्सवाअंतर्गत महानगरपालिकेतर्फे विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी सर्वांना नविन वर्षाच्या हार्दीक शुभेच्छा दिल्या.

गटनेता चेतन पवार यांनी सदर उपक्रम आयोजित केल्याबद्दल महानगरपालिकेचे कौतुक केले व सर्वांना नविन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

अमरावती महानगरपालिका, अमरावती
संविधान महोत्सव

अमरावती महानगरपालिका अमरावती

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९१ वी जयंती १९१ दिवे प्रज्वलीत करुन साजरी

दि.०६/०१/२०२२

अमरावती प्रतिनिधी,

"आझादी का अमृत महोत्सव" अंतर्गत महिला बालकल्याण समिती व विभाग द्वारे दरवर्षी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९१ वी जयंती निमित्त "एक पणती तेजाची" या कार्यक्रमाचे आयोजन दुपारी ५.३० वाजता महानगरपालिका प्रांगणात करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवर तसेच महिला पदाधिकारी व अधिकारी, कर्मचारी यांनी १९१ पणत्या प्रज्वलित करून जयंती उत्सव तेजोमय वातावरणात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस हारार्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी सर्व उपस्थितांनी दिपप्रज्वलन करुन सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. तसेच सावित्रीबाईच्या जयघोषाने संपुर्ण परिसर दुमदुमला.

सदर कार्यक्रमास महापौर चेतन गावंडे, उपमहापौर कुसुम साहु, स्थायी समिती सभापती सचिन रासने, विरोधी पक्षनेता बबलु शेखावत, गटनेता चेतन पवार, झोन सभापती नुतन भुजाडे, महिला बाल कल्याण समिती सभापती सुनंदा खरड, उपसभापती माधुरी ठाकरे, नगरसेवक विलास इंगोले, सुनिल काळे, प्रशांत वानखडे, ऋषी खत्री, आशिष अतकरे, नगरसेविका सुरेखा लुंगारे, जयश्री डहाके, वंदना कंगाले, संगिता बुरंगे, सोनाली करेसिया, रुबिना तबस्सुम हारुण अली, पर्यावरण संवर्धन अधिकारी महेश देशमुख, सहाय्यक आयुक्त भाग्यश्री बोरेकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.सिमा नैताम, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, कार्यकारी अभियंता २ सुहास चव्हाण, कार्यालय अधिक्षक प्रतिभा घंटेवार, समाज विकास अधिकारी धनंजय शिंदे, उपअभियंता श्रीरंग तायडे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता महिला बाल कल्याण समिती सभापती सुनंदा खरड व महिला बाल कल्याण समिती सदस्य, महिला बाल कल्याण अधिकारी तथा उपआयुक्त नरेंद्र वानखडे तसेच महिला बाल कल्याण विभागातील कर्मचा-यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर यांनी केले.

अमरावती महानगरपालिका अमरावती

दि.अ.यो-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभाग

“भारतीय स्वातंत्र्यच्या अमृत महोत्सवाच्या अंतर्गत आयोजित कार्यक्रमाचा अहवाल”

१) संस्कृती अभियान –संस्कृतिक कार्यक्रम

स्वातंत्र्यच्या अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने अभियान अंतर्गत सर्व बचत गट च्या माध्यमातून हळदी कुंकु चे कार्यक्रम चे औचित्य साधून या माध्यमातून गोरगोरीब मुलांना पुस्तके वही वान म्हणून दिले व आरोग्य बाबत जागृती करण्यात आले.

सक्षम अभियान :-

या घटका अंतर्गत महिला व त्यांचा आर्थिक विकास ह्या बाबी मध्यभागी ठेवून महिला करिता उद्योग व आर्थिक शिक्षण या वर तज्ञ व्यक्ति कडून मार्गदर्शन देण्यात आले.सदर कार्यक्रमामध्ये आतापर्यंत १००० बचत गट च्या वर महिलाना सदर प्रक्षिशन देण्यात आले.

कोरोंनामुळे फेरीवाला चे उद्योग दबकाईस आले होते त्या मधून सावरण्या करिता व या घटकांना सक्षम करण्याकरिता त्यांचे जास्तीत जास्त १०००० हजार चे लोण फॉर्म भरण्याकरिता अभियान ची पूर्ण चमू प्रत्यक्ष शॉप वर जाऊन फॉर्म भरण्यात आले. या अंतर्गत आता पर्यन्त ७०९० फेरीवाल्यांचे फॉर्म भरण्यात आले असून ३१५९ फेरीवाल्यांना १०००० लोन मिळाले आहे.

१) प्रभातफेरी -

प्रभात फेरीच्या माध्यमातून आभियान बाबत जनजागृती व लसीकरण बाबत जागृती करण्यात आली. अभियान मधील महिला बचत गट करिता आरोग्य विषयक प्रक्षिशन घेण्यात आले या मध्ये महीलाचे आजार व त्या वर काय काळजी घेऊ शकतो या बाबत तज्ञ डॉक्टर कडून मार्गदर्शन करण्यात आले.

२) आरोग्य तपासणी -

अमृत महोस्तव च्या अनुषंगाने बचत गट व बेघर व्यक्ति करिता आरोग्य तपासणी करण्यात आली व जास्तीत जास्त बचत गट मधील महिला व त्यांचे कुटुंब मधील सदस्य यांना कोविड लसीकरण करून घेण्यात आले. अमृत महोस्तव च्या अनुषंगाने कोरोंना लसीकरण कॅम्प चे एरिया नुसार आयोजन करण्यात आले व या मध्ये १००० च्या वर गट मधील महिलानि लसीकरण करून घेतले.

अमृत महोस्तव च्या अनुषंगाने थंडी मुळे कोणत्याही बेघर व्यक्तीचा मृत्यू होऊ नये म्हणून रात्री बेघर लोकांची शोधमोहीम करण्यात आली.

अमृत महोत्सव

अमृत महोस्तव च्या अनुषंगाने बचत गट करिता वस्ती स्तर संघ मार्फत वस्ती मध्ये “बचत गट वस्तु विक्री प्रदर्शनी” चे आयोजन करण्यात आले या मध्ये अभियान अंतर्गत सर्व वस्तीस्तर संघानि सहभाग घेतला.

अमरावती महानगरपालिकेत प्रजासत्ताक दिनाचा ७२ वा वर्धापन दिन साजरा

P

अमरावती महानगरपालिका, अमरावती

अमरावती महानगरपालिकेत प्रजासत्ताक दिनाचा ७२ वा वर्धापन दिन साजरा

महानगरपालिकेत महापौर चेतन गावंडे यांच्या हस्ते ध्वजारोहन

अमरावती प्रतिनिधी,

“आझादी का अमृत महोत्सव” अंतर्गत अमरावती महानगरपालिकेत प्रजासत्ताक दिनाचा ७२ वा वर्धापन दिन महापौर चेतन गावंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करुन साजरा करण्यात आला. बुधवार दिनांक २६ जानेवारी,२०२२ रोजी अमरावती महानगरपालिकेच्या प्रांगणात सदर ध्वजारोहणाचा कार्यक्रम सकाळी ठिक ८.१५ वाजता घेण्यात आला.

यावेळी स्थायी समिती सभापती सचिन रासने, मनपा आयुक्त डॉ.प्रवीण आष्टीकर, सभागृह नेता तुषार भारतीय, गटनेता चेतन पवार, झोन सभापती नुतन भुजाडे, विधी समिती सभापती बलदेव बजाज, नगरसेवक विलास इंगोले, संजय नरवणे, राजेश साहु, सलीम बेग, नगरसेविका संध्या टिकले, राधा कुरील, सुरेखा लुंगारे, पद्मजा कौंडण्य, जयश्री डहाके, शोभा शिंदे, अनिता राज, वंदना कंगाले, रिता मोकलकर, माला देवकर, लविना हर्षे, सुनिता भेले, संगिता बुरंगे, इंदुताई सावरकर, स्वाती कुलकर्णी, उपआयुक्त सुरेश पाटील, नरेंद्र वानखडे, मुख्यलेखाधिकारी हेमंत ठाकरे, सहाय्यक संचालक नगर रचना आशिष उईके, शहर अभियंता रविंद्र पवार, तांत्रिक सल्लागार जिवन सदार, शिक्षणाधिकारी डॉ.अब्दुल राजीक, कार्यकारी अभियंता २ सुहास चव्हाण, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र लोकशाही निवडणूक व सुशासन दिनांक २६ जानेवारी,२०२२ रोजी पंधरवाडा मोहीम बाबत एन.बी.सोनवणे सर यांनी सविस्तर माहिती दिली.

यावेळी महापौर चेतन गावंडे यांनी भारताच्या ७२ व्या प्रजासत्ताक दिनाच्या मंगलमय प्रसंगी, अमरावतीच्या जनतेला व उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या.

महापौरांनी आपल्या शुभेच्छा देतांना सांगितले की, देशाच्या स्वातंत्र्यासाठी, देशाचा मानसन्मान, प्रतिष्ठा यांसाठी, देशाच्या गौरवासाठी ज्या ज्या लोकांनी आपले योगदान दिले आहे, हालअपेष्टा सहन केल्या, बलिदान दिले, त्याग आणि तपस्येची पराकाष्ठा केली आहे, अशा सर्व महान हुतात्म्यांना मी अमरावतीकरांच्या वतीने शतशः प्रणाम करत आहे.

भारत एक चिरपुरातन राष्ट्र आहे. हजारो वर्षांचा आपला इतिहास आहे, हजारो वर्षाची सांस्कृतिक वारसा आहे. वेदांपासून ते विवेकानंदापर्यंत, उपनिषदांपासून ते उपग्रहांपर्यंत, सुदर्शन चक्रधारी मोहनपासून ते चरखाधारी मोहनपर्यंत, महाभारतातील भीमापासून ते भीमराव आंबेडकरांपर्यंत एक दीर्घ असा आमचा इतिहासाचा प्रवास आहे, वारसा आहे. आम्ही अनेक चढउतार पाहिले आहेत, अनेक पिढयांचा संघर्ष आहे, मानवजातीला महामूल्ये देण्यासाठी तपस्या केली आहे. भारताच वय केवळ सत्तर वर्षे नाही. मात्र पारतंत्र्यानंतर, आपल्याला जे स्वातंत्र्य मिळाले, त्यानंतर एका नव्या व्यवस्थेअंतर्गत आपण देशाला प्रगतीप्रथावर नेण्यासाठी जे कार्य केले, तो प्रवास पंच्याहत्तर वर्षांचा आहे.

आपल्या वेदांमध्ये एक वाक्य आहे- मृत्योः मुक्षीय मामृतात ।

याचा अर्थ असा आहे की, आपण दुःख, कष्ट, क्लेश आणि विनाश यांच्यातून बाहेर पडून अमृताच्या दिशेने पुढे जावे, हाच संकल्प स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचाही आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजे - स्वातंत्र्याच्या शक्तीचे अमृत, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजे- स्वातंत्र्य सैनानींच्या प्रेरणांचे अमृत. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजे- नवीन विचारांचे अमृत. नवीन संकल्पांचे अमृत. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजे- आत्मनिर्भरतेचे अमृत. आणि म्हणूनच हा महोत्सव राष्ट्राच्या जागरणाचा महोत्सव आहे. हा महोत्सव, सुराज्याची स्वप्ने पूर्ण करण्याचा महोत्सव आहे. हा महोत्सव, वैश्विक शांतीचा, विकासाचा महोत्सव आहे.

गेल्या दोन वर्षांपासून जगभरात कोविड-१९ विषाणूचा प्रसार होत होता, अमरावती शहरात कोविड-१९ चा पहिला रुग्ण एप्रिल महिन्यात सापडला. पण या विषाणूच्या प्रादुर्भावाची चाहूल लागताच अमरावती महानगरपालिकेने अतिशय जबाबदारीने कोविड विरोधातील लढाई लढत कोविडचा संसर्ग कमी करण्यासाठी प्रयत्न केले, याकरिता अमरावतीतील सर्व कोविड योद्ध्यांचे मी मनापासून कौतुक करतो.

दोन वर्षभरापेक्षा अधिक काळ आपण कोविड विषाणूविरोधात एकजूटीने लढत आहोत. सध्या कोविड रुग्णांची संख्या कमी जास्त होत असतांना दिसून येत आहे. मनपाने आरोग्याला केंद्रस्थानी ठेवून अनेक निर्णय घेतले. तरी परिस्थिती आटोक्यात राहावी यासाठी सर्व संबंधित यंत्रणेने आरोग्य यंत्रणेबरोबर सतर्क राहून रात्रंदिवस काम केले आहे. येणाऱ्या काळातही धैर्य दाखवून आपल्या आरोग्याबाबत सतर्कता बाळगणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळात आपण सामाजिक अंतराचे नियम पाळणे, मुखपट्टी सतत लावणे, हातांची स्वच्छता ठेवणे याला प्राधान्य देत आपण सर्वांनीच स्वयंशिस्त पाळून नवी जीवनशैली स्वीकारुया.

भारतातील लोकशाही प्रणाली सुदृढ, सक्षम व विकसित करण्याच्या उद्देशाने सरकारने कल्याणकारी शासन व्यवस्थेचा स्वीकार केला. या संकल्पनेतुन स्थानिक शासन संस्था निर्मिती झाली. १५ ऑगस्ट १९८३ मध्ये अमरावती महानगरपालिका स्थापना झाली होती. आज मनपा स्थापन होऊन ३८ वर्ष पूर्ण होत आहे. अमरावती महानगरपालिकेच्या वतीने अनेक लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहे.

माहिती तंत्रज्ञानामुळे आपले जीवन सुलभ झाले आहे. या तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करुन प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख, गतिमान तसेच पारदर्शी होण्यासाठी महाराष्ट्र बँकच्या सहकार्याने संपूर्ण महानगरपालिकेचे कामकाज संगणकीकरण करण्याच्या कामाला प्रारंभ झाला आहे.

कचऱ्याचे संकलन, वाहतूक, ओल्या व सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया यासाठी सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे काम पूर्णत्वास येत आहे. साठलेल्या जुन्या कचऱ्यावर प्रक्रियेसाठी काम हातात घेतली आहेत.

वैद्यकीय उपचार महाग होत असतांना सर्वसामान्यांना वैद्यकीय सेवा व उपचारासाठी १० हजार रुपयांची मदतीचा हात देण्याचा निर्णय घेतला.

रमाई आवास योजना सोबतच प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सन २०२२ पर्यंत सर्वांना घरे देण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वसामान्यांना घर मिळावे यासाठी कालबद्ध कार्यक्रम अंमलबजावणी महानगरपालिका ठामपणे करत आहे.

महिला व सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततासाठी अमरावती मनपा क्षेत्रातील चौकात सी.सी.टी.व्ही. लावण्याचा संकल्प केला आहे, त्यादृष्टीने पावले उचलली आहेत.

अमरावती येथे पर्यटन स्थळे विकसित करण्याच्या उद्देशाने शिवटेकडी, भीमटेकडी, वडाळी व छत्री तलाव येथील सौंदर्यीकरण प्रगतीपथावर आहे.

अमरावती शहराचा आवाका, लोकसंख्या आणि वाहनांची संख्या वाढत असल्यामुळे वाहतुकीची कोंडी होत असल्याने राजापेठ येथे उड्डाणपूल व भुयारी मार्ग करून नागरिकांना दिलासा दिला.

कोरोना काळात संकटामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शहरातील दिव्यांगांना वार्षिक सहा हजार रुपयांऐवजी नऊ हजार रुपये पेन्शन देण्याचा निर्णय घेतला आहे.

अमरावती शहरासोबतच जिल्हातील स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याच्या हेतूने सुसज्ज अभ्यासिकेचे निर्माण केले आहे.

सर्वच घटकातील विचारांच्या समाजघटकांना सोबत घेऊन, सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध करुन प्रगत, समर्थ आणि बलशाली अमरावती घडविण्यासाठी महानगरपालिका काम करीत आहे.

देशाच्या राज्यघटनेप्रती आपणा सर्वांचे उत्तरदायित्व आहे, आजच्या या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्याने संविधानाने घालून दिलेले आदर्श व मूल्ये यांच्याप्रती असलेली आपली बांधिलकी अधिक दृढ करुया आणि एक बलशाली, प्रगतीशील व सर्वसमावेशक अशा नवीन अमरावतीच्या निर्मितीसाठी कटीबध्द होऊ या, असे यावेळी महापौर चेतन गावंडे यांनी सांगितले.

यावेळी महानगरपालिका मराठी माध्यमिक मुलांची शाळा वडरपुरा येथील विद्यार्थ्यांच्या बँन्ड पथकाने यावेळी राष्ट्रगीत सादर केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एन.बी. सोनवणे सर व विजय खंडारे सर यांनी केले.

अमरावती महानगरपालिका
विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सभागृह

मनपात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

अमरावती प्रतिनिधी,

"आझादी का अमृत महोत्सव" अंतर्गत शनिवार दिनांक १९ फेब्रुवारी,२०२२ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्य मा.महापौर चेतन गावंडे यांचे शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात करण्यात आले. सदर कार्यक्रमानंतर शिवटेकडी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याला मा.महापौर चेतन गावंडे यांचे हस्ते हारार्पण करण्यात आले.

"आझादी का अमृत महोत्सव" अंतर्गत शिवटेकडीवर रंगीबेरंगी लाईटींग लावण्यात आली.

यावेळी उपमहापौर कुसुम साहु, स्थायी समिती सभापती सचिन रासने, महानगरपालिका आयुक्त डॉ.प्रवीण आष्टीकर, सभागृह नेता तुषार भारतीय, गटनेता डॉ.राजेंद्र तायडे, झोन सभापती नुतन भुजाडे, शहर सुधार समिती सभापती आशिष अतकरे, नगरसेवक प्रकाश बनसोड, प्रशांत वानखडे, अजय सारसकर, ऋषी खत्री, प्रणित सोनी, नगरसेविका संध्या टिकले, सुरेखा लुंगारे, सुनंदा खरड, जयश्री डहाके, वंदना मडघे, लविणा हर्षे, स्वाती कुलकर्णी, उपआयुक्त सुरेश पाटील, उपआयुक्त नरेंद्र वानखडे, पर्यावरण संवर्धन अधिकारी महेश देशमुख, सहाय्यक आयुक्त योगेश पिठे, प्राची कचरे, नंदकिशोर तिखिले, नगरसचिव मदन तांबेकर, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, समाज विकास अधिकारी धनंजय शिंदे, सहाय्यक प्रकल्प संचालक वंदना गुल्हाणे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उपआयुक्त नरेंद्र वानखडे यांनी शिवरायांवर गीत सादर केले.

50 %

80

अमरावती महानगरपालिका, अमरावती

अभिलेखागार विभाग व अभिषेक बुक सेंटर यांचे संयुक्त विद्यमाने

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत भव्य पुस्तक प्रदर्शनीचे उदघाटन

अमरावती प्रतिनिधी,

अमरावती महानगरपालिका अभिलेखागार विभाग व अभिषेक बुक सेंटर यांचे संयुक्त विद्यमाने भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त पुस्तकांचे भव्य प्रदर्शनाचे रविवार दिनांक २० फेब्रुवारी,२०२२ रोजी दुपारी वनिता समाज येथे उदघाटन महानगरपालिका आयुक्त डॉ.प्रवीण आष्टीकर यांच्या हस्ते करण्यात आले. सदर उदघाटनास सौ.बबीता आष्टीकर मॅडम, उपआयुक्त (सामान्य) नरेंद्र वानखडे, जनसंपर्क अधिकारी भूषण पुसतकर तथा अभिलेखागार विभागातर्फे प्रभारी अभिलेखापाल रविंद्र चांडोळे व अरुण चौखंडे तसेच मनोज घटाळे व अभिषेक बुक सेंटर चे व्यवस्थापक अखिल शेख व केशव घुटे उपस्थित होते.

दिनांक २० फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी पर्यंत सुरू असलेल्या या प्रदर्शनात अमरावती शहराचा इतिहास (खंड भाग-१ते३), चरित्र, ऐतिहासिक, व्यक्तीमत्वविकास, कथा-कादंब-या, बालवाडमय, कविता, संगीत, शब्दकोश, स्पर्धा परीक्षा, आदी विषयांची मराठी आणि इंग्रजी पुस्तके सवलतीत उपलब्ध आहेत.

तसेच शिवाजी सावंत, रणजित देसाई, विश्वास पाटील, सुधा मूर्ती, व.पु.काळे, अच्युत गोडबोले, अमिश त्रिपाठी यासारखे अनेक नामवंत लेखकांची पुस्तके १०% पासून ते ५०% पर्यंत सवलतीत उपलब्ध आहेत.या भव्य प्रदर्शनाची वेळ सकाळी १०.०० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत आहे.

सर्व अमरावतीकर नागरिकांनी सदर भव्य पुस्तक प्रदर्शनीला आपले कुटूंबा समवेत आपले पाल्याचे ज्ञानवर्धना करीता सहभाग नोंदवावा व सदर पुस्तक प्रदर्शनी मध्ये अमृत महोत्सवा निमित्य पुस्तक खरेदी वर विशेष सुट देण्यात आलेली असुन त्याचा लाभ घ्यावा. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत भव्य पुस्तक प्रदर्शनीला जास्तीत जास्त अमरावतीकर नागरिकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन अमरावती महानगरपालिकेने केले आहे.

आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत सर्व सन्मा.पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक, सन्मा.नगरसेविका यांचा ग्रुप फोटो

MAS Training - (महिला आरोग्य समिती) - प्रशिक्षण - 2021-22

(NUHM PIP - शिर्ष क्रं.U.3.2.1.1)

अमरावती महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकुण 257 आशा आहेत व सदर आशा 13 शहरी आरोग्य केंद्रा अंतर्गत कार्यरत आहेत व प्रत्येक आशा मागे 1 महिला आरोग्य समिती असते (8 ते 9 महिलांचा गट) तरी मा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये दि.15/02/2022, 14/02/2022 व दि.09/02/2022 रोजी batches मध्ये एकुण 180 सदस्याचे प्रशिक्षण घेण्यात आले. तसेच सदर प्रशिक्षणामध्ये महिला आरोग्य समितीचे सदस्य व आशा उपस्थित होत्या. सदर प्रशिक्षण कार्यक्रम व्यवस्थापक - वर्षा गुहे, मा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे व मा.डॉ.पोर्णिमा उघडे - स्त्री वैद्यकिय अधिकारी यांच्या व्दारे घेण्यात आले. मा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांनी पल्स पोलिओ जनजागृती व इतर विविध आरोग्य विषयक योजनाबाबत महिला आरोग्य समिती सदस्यांना व आशा यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रम / प्रशिक्षणामध्ये - श्री गोपाल चव्हाण, श्री. निखिलेश डोंगरे - (शिपाई) यांनी व्यवस्था बघण्यात परिश्रम घेतले. प्रशिक्षणाची वेळ सकाळी 11.00 ते 4.00 अशी ठेवण्यात आलेली होती.

MAS TrainingProgramme - Dt.09/02/2022, Dt.14/02/2022, Dt.15/02/2022

RCH PIP - शिर्ष क्रं.9.5.2.4 - Child Death Training -

उपरोक्त विषयान्वये दि.24/02/2022 रोजी मा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहा येथे Child Death Review ही activity घेण्यात आली.

सदर training अंतर्गत 13 शहरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकिय अधिकारी, staff nurse / PHN यांचे बालमृत्यु बाबत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणा मध्ये मा.डॉ.जयश्री नांदुरकर, मा.श्रीमती विदया बारसे (Head Quarter - PHN) व मा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे यांचे मार्गदर्शन लाभले. तर कार्यक्रम आयोजनासाठी, कार्यक्रम व्यवस्थापक वर्षा गुहे, लेखाव्यवस्थापक श्री. विजय रणदिवे, यांनी परिश्रम घेतले. तर कार्यक्रमामधे शिपाई, श्री गोपाल चव्हाण, हैदरपुरा शहरी आरोग्य केंद्र शिपाई श्री. निखिलेश डोंगरे यांचे सहकार्य लाभले.

Training चा उद्देश :- मनपा कार्यक्षेत्रातील बालमृत्यु दर कमी करण्यासाठी व सदर बालमृत्यु चे reporting करणे संदर्भात प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

Child Death Review Training- Dt. 24/02/2022

आज़ादी का
अमृत महोत्सव

WIFS - प्रशिक्षण Dated -29/12/2021 (RCH PIP -Budget Head - 9.5.4.9) -

उपरोक्त विषयास अनुसरून दि.29/12/2021 रोजी मा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये WIFS - Weekly Iron & Folic Supplementation अंतर्गतसर्वMedical Officers व Staff Nurse / PHN यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. सदर प्रशिक्षण HFWPTC (Training Center) चे वैद्यकिय अधिकारी डॉ. रमेश बनसोड यांनी घेतले.

प्रशिक्षणास ICDS प्रकल्प अधिकारी श्री. अतुल भंडागे, शिक्षण विभागाचे श्री. योगेश राणे व श्री. संजय बेलसरे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजनाकरीता कार्यक्रम व्यवस्थापक वर्षा गुहे, सहकार्य शिपाई - श्री. गोपाल चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

Weekly Iron & Folic Supplementation (WIFS) - Dt. 29/12/2021

अमरावती महानगरपालिका
विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

Child Death Audit - RCH PIP - 10.1.2 -

उपरोक्त विषयास अनुसरून RCH PIP - Budget 10.1.2 अंतर्गत 13 शहरी आरोग्य केंद्रा अंतर्गत एकुण 35 लोकांचे (MO, Staff Nurse, ANM) यांचे Child Death Audit ही activity घेण्यात आली. सदर activity अंतर्गत 13 शहरी आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात झालेल्या child death ची कारण मिमावंसा जाणुन घेऊन - प्रत्येक शहरी आरोग्य केंद्र निहाय अहवाल घेण्यात आला. सदर audit मुख्यालय Public Health Nurse श्रीमती विदया बारसे यांनी केले. कार्यक्रमास मा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, मा.डॉ.जयश्री नांदुरकर यांनी सुध्दा मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आयोजन, कार्यक्रम व्यवस्थापक वर्षा गुहे यांनी केले.

Child Death Audit

ASHA Day / ASHA Samelan -NUHM PIP - Budget Head - U.3.1.3.3-

दि.23/02/2022 व दि.24/02/2022 रोजी मा.डॉ.बाबासोहब आंबेडकर सभागृहामध्ये Samelan / संम्मेलन आशा-डे हा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमामध्ये प्रमुख उपस्थिती मा.उपायुक्त (सा.), मा.वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांची होती. तर वैद्यकिय अधिकारी म्हणुन मा.डॉ.जयश्री नांदुरकर उपस्थित होत्या. तर कार्यक्रम आयोजनामधे कार्यक्रम व्यवस्थापक वर्षा गुहे, लेखा व्यवस्थापक श्री. विजय रणदिवे यांनी परिश्रम घेतले.

तरी सहकार्य - शिपाई - श्री. गोपाल चव्हाण, श्री. निखिलेश डोंगरे, श्री. लकी यांनी केले.

ASHA Day / ASHA Samelan - Dt.23/02/2022 & Dt. 24/02/2022

ASHATraining - U.3.1.2-

दि.05/03/202ते दि.24/03/2022 पर्यंत District Training Center, Amravati येथे नवीन 128 आशा चे प्रत्येकी 30 आशाच्या batches मध्ये HBNC Phase-1 & Phase -2 चे प्रशिक्षण सुरू आहे.

HBNC - (Home Based Newborn Care) सदर प्रशिक्षण हा ASHA च्या रोजच्या कामाशी निगडीत आहे.

HBNC Training Phase-1 & Phase -2

Outreach RCH Camp -

NUHM कृती आराखडा सन 2021-22 मधे FMR Code - U.2.3.2 अंतर्गत 13 शहरी आरोग्य केंद्राच्या कार्यकक्षेत एकुण 52 (प्रति शहरी आरोग्य केंद्र - 4)outreach camp घेण्याचे उद्दीष्ट आहे तरी अदयापर्यंत 20 camp घेण्यात आलेले आहेत. सदर health camp मधे ANC, PNC, Child यांचे विविध आजारांचे checkup करण्यात येऊन specialist बोलावुन औषधोपचार दिले जातात.

Outreach RCH Camp

NUHM कृती आराखडा सन 2021-22 मधे FMR Code - U.2.3.2

UHND Session - (Urban Health & Nutrition Days) -

NUHM कृती आराखडा FMR Code - P.4.5.1 मध्ये UHND Session चे 1560 sessions चे उद्दीष्ट आहे. सदर activity 13 शहरी आरोग्य केंद्राच्या कार्यकक्षेत ANM's मार्फत घेण्यात येते. सदर activity अंतर्गत, ANC तसेच PNC मातांना लसीकरण, आहार, रक्तक्षय तसेच विविध आजार हया विषयी सभा घेऊन मार्गदर्शन करण्यात येते. प्रत्येक शहरी आरोग्य केंद्राला एकुण 120 UHND sessions चे उद्दीष्ट आहे. तरी अदयापपर्यंत 1515 UHND session पुर्ण झालेले आहे.

UHND Session - (Urban Health & Nutrition Days)

NUHM कृती आराखडा FMR Code - P.4.5.1

महिला आरोग्य समिती सभा-

NUHM कृती आराखडा2021-22 नेहमीप्रमाणे हया वर्षी सुध्दा FMR Code - U.4.1.4 मध्ये महिला आरोग्य समितीच्या सभा घ्यावयाच्या आहेत. प्रत्येक आशाच्या मागे १ महिला आरोग्य समितीची स्थापना झालेली आहे. तरी एकुण 258 महिला आरोग्य समितीच्या स्थापनेचे उद्दीष्ट आहे. 13 शहरी आरोग्य केंद्रानी एकुण 200 महिला आरोग्य समितीची स्थापना केलेली आहे. तरी श.आ.केंद्र स्तरावर, अदयापपर्यंत 385 MAS meeting झालेल्या आहेत.

महिला आरोग्य समिती सभा

आरोग्यवर्धिनी अंतर्गत विविध कार्यक्रम-

एकुण 7 शहरी आरोग्य केंद्र health & wellness center म्हणजेच आरोग्य वर्धिनी केंद्र म्हणून शासनाने घोषित केलेले आहेत. तरी सन 2021-2022 NHM, मुंबई यांनी सुचित केल्यानुसार Rallys, Yoga Sessions, अशा activities आयोजित केल्या गेल्या.

आरोग्यवर्धिनी अंतर्गत विविध कार्यक्रम

PMMY - (पंतप्रधान सुरक्षित मातृत्व अनुदान योजना) -

सदर योजने अंतर्गत सन 2021-22 मध्ये गर्भवती माते करीता आहार प्रदर्शनी, रांगोळी स्पर्धा अशा विविध activities 13 शहरी आरोग्य केंद्रा अंतर्गत आयोजित करण्यात आल्यात.

PMMY - (पंतप्रधान सुरक्षित मातृत्व अनुदान योजना)

Shot on OnePlus

माध्यमिक विद्यालय
Shot on OnePlus
By @ankush sukhdan

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व ऊर्जा संवर्धन सप्ताह कार्यक्रम मनपा हिंदी कन्या माध्यमिक शाळा नागपुरी गेट येथे उत्साहात संपन्न....

मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी व्हावे जुनियर कॉलेज निर्माण----सभापती आशिषकुमार गावंडे...

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती निर्माण व्हावी व ऊर्जेचा कमीत कमी वापर करून जास्तीत जास्त ऊर्जा कशी वाचवता येईल याची जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने संपूर्ण भारतामध्ये आजादी का अमृत महोत्सव मोठ्या प्रमाणात सर्व शासकीय प्रशासकीय विभागांमध्ये साजरा करण्यात येत आहे. तसेच ऊर्जा संवर्धन सप्ताह सुद्धा अनेक विभागांमध्ये राबविणे सुरू आहे. याच अनुषंगाने दिनांक २१ डिसेंबर,२०२१ रोजी मनपा हिंदी कन्या माध्यमिक शाळेच्या प्रांगणामध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व ऊर्जा संवर्धन सप्ताह विविध स्पर्धा घेऊन साजरा करण्यात आला. ऊर्जा संवर्धन सप्ताहांतर्गत नाट्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, निबंध

स्पर्धा व इतर स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले मनपाचे शिक्षण समिती सभापती आशिषकुमार गावंडे यांच्या हस्ते आद्यशिक्षीका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून झाली यानंतर प्रमुख पाहुणे शिक्षण सभापती आशिष गावंडे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, शिक्षण अधिकारी डॉक्टर अब्दुल राजिक व इतर मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ भेट देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन सौ राजश्री कुलकर्णी व प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री पंकज मेश्राम यांनी केले. उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी सर्व पालकांना आव्हान केले की, ज्या पद्धतीने आपल्याला शक्य होईल त्या पद्धतीने मनपाच्या शाळांना मदत करावी. शिक्षण सभापती आशिषकुमार गावंडे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत बोलले की शिक्षणा सोबतच मैदानी खेळ सुद्धा सर्व विद्यार्थ्यांनी खेळावे, जेणेकरून सर्वांचे आरोग्य तंदुरुस्त राहील व आपण कोर कोरोना सारख्या महाभयंकर आजाराला बळी पडणार नाही. मनपाचे विद्यार्थी अतिशय हुशार असून अमरावती महानगरपालिकेच्या क्षेत्रातील मनपा शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ज्युनिअर कॉलेज ची निर्मिती व्हावी अशी इच्छा आशिष गावंडे यांनी शिक्षण अधिकाऱ्यांसमोर व्यक्त केली. यानंतर विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. ज्यामध्ये एपीजे अब्दुल कलाम ग्रुपच्या सानिया आनम व कैकशा परवीन यांना प्रथम पारितोषिक मिळाले. आईन्स्टाईन ग्रुप च्या अनसार डाली, शेख अल्फाज यांना द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. तसेच न्यूटन ग्रुपच्या अल्सफा व आलपिया यांना तृतीय क्रमांक पटकाविला .घोषवाक्य स्पर्धेमध्ये महेक परविन व शेख युसुफ यांचा प्रथम क्रमांक आला. महक अंजुम आणि अब्दुल जहीर हिचा द्वितीय क्रमांक आला. वकृत्व स्पर्धेमध्ये कुमारी साम्या मुमताज खान, जुन्या फातिमा कैकशा परवीन, आलिया कौसर सय्यद शहजाद, अल्फिया शेख iqrar यांनी पारितोषिक मिळविले. प्रश्नमंजुषा स्पर्धा मध्ये साम्या मुमताज खान, आयशा फातिमा, आफ्रीन फातेमा, महेक नाज, शेख आयुब, आरसी अनम, तसलीम अंजुम इत्यादी विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली शिक्षण सभापती आशिष कुमार गावंडे यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना ही बक्षीस वितरण करण्यात आली. गावंडे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षकांचे व मुख्याध्यापकांचे कौतुक केले. ऊर्जा प्रकल्प अधिकारी श्री हर्षल काकडे, माजी नगरसेवक अहमद भाई, प्रमोद शेगोकार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये शाळेचे मुख्याध्यापक डॉक्टर प्रकाश मेश्राम यांचे मोलाचे योगदान मिळाले. कार्यक्रमाला

मनपा हिंदी प्राथमिक शाळा क्रमांक 12 चे मुख्याध्यापक श्री नाईक सर, सावंत सर, घाटोळ मॅडम, कु निखत परवीन, अनिता भांगे, भावना बडे, शुभम देशमुख, व इतर उपस्थित होते कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मंगला व्यास मॅडम यांनी केले.

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत दिव्यांगांना बॅटरी चलीत ट्रायसिकल चे वाटप
तसेच दि १ एप्रिल रोजी UDID प्रमाणपत्र शिबिराचे आयोजन

दिनांक ०१/०४/२०२२

अमरावती प्रतिनिधी,

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत अमरावती महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत दि. २७/ ०३/२०२२ ते दि ०२/ ०४/ २०२२ अमृत महोत्सव आठवडा साजरा करण्यात येत असून दिव्यांगाकरीता विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने मंगळवार दिनांक २९ मार्च,२०२२ रोजी अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगांना लाभ घेण्याकरीता व त्यांची नोंदणी करणेकरीता www.amcdivyangkalyan.com ही ऑनलाईन आज्ञावली तयार करून आज्ञावलीचा शुभारंभ महानगरपालिका प्रशासक डॉ.प्रवीण आष्टीकर यांच्या हस्ते करण्यात आला होता.

तसेच दि. ३०/०३/२०२२ रोजी प्रशासक डॉ. प्रवीण आष्टीकर यांचे हस्ते गरजू व पात्र दोन दिव्यांगांना बॅटरी चलीत ट्रायसिकल चे वाटप करण्यात आले असून मनपाद्वारा सदर एकूण १०० ट्रॅसायकल वाटप करण्यात येणार असून सदर ट्रायसिकल मुळे दिव्यांगांना व्यवसाय करण्यास सोयीस्कर होऊन त्यांचे दैनंदिन जीवनामध्ये लाभकारक ठरेल.

तसेच दि. ०१ एप्रिल २०२२ रोजी अमरावती महानगरपालिका (शिक्षण विभाग) व जिल्हा सामान्य रुग्णालय यांनी संयुक्त UDID प्रमाणपत्र शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. सदर शिबीर स.९ ते दु. १२ पर्यंत जिल्हा सामान्य रुग्णालय येथे घेण्यात येणार असून त्याअंतर्गत दिव्यांगाची UDID प्रणालीद्वारा ऑनलाईन अर्ज मनपाकडून मोफत भरून देन्यात येणार आहेत व रुग्णालयात त्यांची तपासणी करण्यात येईल. त्यांनतर दिव्यांगांना UDID प्रमाणपत्र प्राप्त होईल.

सदर उपक्रम समाज विकाज अधिकारी श्री धनंजय शिंदे यांचे मार्फत राबविण्यात येत आहे.

अमृत महोत्सव

दिव्यांगांकरिता UDID प्रमाणपत्र शिबिराचे आयोजन

दिनांक ०१/०४/२०२२

अमरावती प्रतिनिधी,

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत अमरावती महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत दि. २७/०३/२०२२ ते दि ०२/०४/२०२२ अमृत महोत्सव आठवडा साजरा करण्यात येत असून दिव्यांगाकरीता विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने मंगळवार दिनांक २९ मार्च,२०२२ रोजी अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगांना लाभ घेण्याकरीता व त्यांची नोंदणी करणेकरीता ऑनलाईन आज्ञावली तयार करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने मा.श्री.डॉ.प्रविण आष्टीकर प्रशासक तथा आयुक्त यांच्या मार्गदर्शनात दि ०१ एप्रिल,२०२२ रोजी अमरावती महानगरपालिका व जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती यांचे मार्फत दिव्यांगांकरिता UDID प्रमाणपत्र शिबिराचे आयोजन जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे करण्यात आले होते.

सदर शिबिरात ऑनलाईन नोंदणी केलेल्या दिव्यांगांची शारीरिक तपासणी करणे तसेच नवीन दिव्यांग व ज्यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन नाही अश्या दिव्यांगांचे ऑनलाईन अर्ज भरून देऊन त्याच ठिकाणी तपासणी करून UDID प्रमाणपत्र मिळणे करिता प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

सदर शिबीराचे आयोजन अमरावती शहरातील रहीवाशी असलेल्या सर्व दिव्यांगांकरिता करण्यात आले होते. या शिबिराकरीता मा.सिमा नैताम उपायुक्त (सा.) व शिक्षणाधिकारी मा.श्री.डॉ. अब्दुल राजीक यांनी सदिच्छ भेट दिली. या शिबिराचे आयोजन श्री धनंजय शिंदे समाज विकास अधिकारी यांचे मार्फत करण्यात आले असून श्री धिरज सावरकर समावेशित शिक्षण समन्वयक, श्री.डॉ. सचिन कराळे, कु. दिपाली थोरात समावेशित विषयतज्ञ, श्री अतुल बोबडे, कु. सोनिया पवार, कु. वैशाली सोळंके,श्री कैलास कुलट, श्री उज्वल जाधव, श्री विशाल वालचाळे, श्री सुमेश वानखडे, कु. कुमुदीनी देवळे, कु. भारती मालखेडे, कु. पुनम कणेर, श्री गिरीष लाकडे श्री मोरेश्वर चव्हाण, कु. प्रतीभा देवपारे, कु. रेखा बोंदरे, कु. प्रतीमा नागापुरे विशेष शिक्षक व श्री धिरज घोरदडे, नरेश उईके यांनी परीश्रम घेतले.

अमरावती

अमरावती

अमरावती

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत दिव्यांगांना लाभ घेण्याकरीता व नोंदणी करणेकरीता महानगरपालिका प्रशासक डॉ.प्रवीण आष्टीकर यांच्या हस्ते ऑनलाईन आज्ञावलीचा शुभारंभ

दिनांक २९/०३/२०२२

अमरावती प्रतिनिधी,

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत अमरावती महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत दि. २७/ ०३/२०२२ ते दि ०२/०४/२०२२ अमृत महोत्सव आठवडा साजरा करण्यात येत असून,दिव्यांगाकरीता विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने मंगळवार दिनांक २९ मार्च,२०२२ रोजी अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगांना लाभ घेण्याकरीता व त्यांची नोंदणी करणेकरीता ऑनलाईन आज्ञावली तयार करण्यात आली आहे. सदर आज्ञावलीचा शुभारंभ महानगरपालिका प्रशासक डॉ.प्रवीण आष्टीकर यांच्या हस्ते करण्यात आला.

शहरातील दिव्यांगांना आता आपल्या नावाची नोंदणी महानगरपालिकेत करता येणार असून त्याद्वारा भविष्यात दिव्यांगांना त्यांचे करिता असलेले लाभ घेणे याप्रणाली मुळे सोयीस्कर होणार आहे. त्यासाठीच महानगरपालिकेने www.amcdivyangkalyan.com पोर्टल प्रणाली विकसित केली आहे. या प्रणालीच्या www.amcdivyangkalyan.com या संकेतस्थळावर ज्या दिव्यांगणी आता पर्यंत महानगर पालिकेत नोंदणी केली नाही, अश्या दिव्यांगांना सर्वप्रथम नोंदणी करायची आहे. www.amcdivyangkalyan.com पोर्टल प्रणालीचा वापर करून जास्तीत जास्त दिव्यांगानी आपल्या नावाची नोंद महानगर पालिकेत करून घ्यावी, असे महानगरपालिका प्रशासक डॉ.प्रवीण आष्टीकर यांनी केले आहे. तसेच प्रणाली द्वारा प्राप्त होणारी दिव्यांगाची माहिती नुसार भविष्यात महानगरपालिकेला दिव्यांगांचे आर्थीक स्थर वाढवणाऱ्या व दिव्यागाकरिता लाभदायक योजना सुरू करण्यास मदत होईल, असे मत डॉ. प्रवीण आष्टीकर प्रशासक यांनी व्यक्त केले.

यावेळी अधिकारी उपस्थित होते.

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडक
अमरावती महानगरपालिका, अमरावती

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडक
अमरावती महानगरपालिका, अमरावती

डॉ बाबासाहेब आंबेडकर समूह
अमरावती महानगरपालिका, अमरावती
अमृत महोत्सव

“आझादी का अमृत महोत्सव” व “माझी वसुंधरा अभियान” अंतर्गत
अमरावती महानगरपालिका प्रशासक डॉ.प्रवीण आष्टीकर यांच्यासह
अधिकारी व कर्मचा-यांनी घेतली जलप्रतिज्ञा

दिनांक २९/०३/२०२२

अमरावती प्रतिनिधी,

केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या निर्देशानुसार भू:गर्भातील व पावसाच्या पाण्याचा योग्य वापर करून या पाण्याची बचत करणे करीता मंगळवार दिनांक २९ मार्च,२०२२ रोजी जलप्रतिज्ञा घेण्यात आली.

“आझादी का अमृत महोत्सव” व “माझी वसुंधरा अभियान” अंतर्गत मंगळवार दिनांक २९ मार्च,२०२२ रोजी अमरावती महानगरपालिकेमध्ये जागतिक जलदिना निमित्त कार्यक्रम विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे घेण्यात आला. यावेळी महानगरपालिका प्रशासक डॉ.प्रवीण आष्टीकर यांच्यासह अधिकारी व कर्मचा-यांनी जलप्रतिज्ञा घेतली.

यावेळी उपायुक्त सुरेश पाटील, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक संचालक नगर रचना आशिष उईके, पर्यावरण संवर्धन अधिकारी महेश देशमुख, तांत्रिक सल्लागार जिवन सदार, सहाय्यक आयुक्त योगेश पिठे, प्राची कचरे, नंदकिशोर तिखिले, श्रीरंग तायडे, तौसिफ काझी, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.सिमा नैताम, नगरसचिव मदन तांबेकर, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, शिक्षणाधिकारी डॉ.अब्दुल राजीक, कार्यकारी अभियंता २ सुहास चव्हाण, पशुशल्य चिकीत्सक डॉ.सचिन बोंन्द्रे, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, कार्यालय अधिक्षक संजय दारव्हेकर, भांडार अधिक्षक मंगेश जाधव, अतिक्रमण पथक प्रमुख अजय बन्सेले, बाजार व परवाना अधिक्षक उदय चव्हाण, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

अमरावती महानगरपालिका, अमरावती

मनपात शहीद दिनानिमित्य भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांना श्रध्दांजली अर्पण

मनपात अमर शहीद हेमू कलानी जयंती साजरी

अमरावती प्रतिनिधी,

"आझादी का अमृत महोत्सव" अंतर्गत बुधवार दिनांक २३ मार्च,२०२२ रोजी अमरावती महानगरपालिकेमध्ये शहीद दिन व अमर शहीद हेमू कलानी यांची जयंती साजरी करण्यात आली. या निमित्य महानगरपालिका प्रशासक डॉ.प्रविण आष्टीकर यांच्या हस्ते भगतसिंग, सुखदेव, राजगुरु व अमर शहीद हेमू कलानी यांच्या प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आले. यावेळी शहीदांना दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली देण्यात आली.

यावेळी उपायुक्त सुरेश पाटील, उपायुक्त नरेंद्र वानखडे, पर्यावरण संवर्धन अधिकारी महेश देशमुख, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, नगरसचिव मदन तांबेकर, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, कार्यालय अधिक्षक संजय दारव्हेकर, समाज विकास अधिकारी धनंजय शिंदे, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, माजी नगरसेवक ऋषी खत्री, श्रीचंद तेजवाणी, पुज्य पंचायत अध्यक्ष डॉ.इंद्रकुमार गेमनानी, मुरलीधर उदासी, अमृतलाल पिंजानी, कन्हैयालाल ढालवानी, केशवलाल छाबडीया, नारायणदास गोधवानी, जुमन बजाज, तीरतदास बजाज, ओमप्रकाश सदूभाई पुन्शी, दीपक साई, मनोहरलाल मोर्डीया, अशोक नागवानी, नितीन ढोडेजा, राजा त्रिकोटी, ईश्वरदास मारवीजा, सुरेश जयसिध्दनी, वासुदेव कृष्णानी, ओमप्रकाश खेमचंदानी, मनपा अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मनपाच्या विविध वाहनांची तपासणी व दुरुस्ती याबाबत प्रशिक्षण

दिनांक ०९/०३/२०२२

अमरावती प्रतिनिधी,

"आझादी का अमृत महोत्सव" अंतर्गत कार्यशाळा विभागामार्फत नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यशाळेत येणाऱ्या मनपाच्या विविध वाहनांची तपासणी व दुरुस्ती याबाबत प्रशिक्षण दिनांक ०९/०३/२०२२ रोजी आयोजित करण्यात आले होते. यात कंत्राटदाराचे तज्ञ मेकॅनिक श्री कलीम यांनी इतर कार्यशाळेतील सर्व उपस्थित प्रशिक्षणार्थी यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन वाहन दुरुस्ती कशाप्रकारे करता येईल याची सविस्तर माहिती दिली.

वडाळी येथील महानगरपालिका शाळा क्र.१४ येथे डिजीटल क्लासरुम चे उदघाटन
मनपा शाळेतील विद्यार्थी आता घेणार डिजीटल पध्दतीने शिक्षण

दिनांक १०/०३/२०२२

अमरावती प्रतिनिधी,

"आझादी का अमृत महोत्सव" अंतर्गत मनपा शाळामध्ये गोरगरीब विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या उद्देशाने तसेच शाळामधील पटसंख्या वाढावी या हेतूने वडाळी येथील महानगरपालिका शाळा क्र.१४ येथे डिजीटल क्लासरुम चे उदघाटन मनपा उपआयुक्त नरेंद्र वानखडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी मनपा शिक्षणाधिकारी डॉ.अब्दुल राजीक, रोटरी क्लब ऑफ अमरावती इंद्रपुरीचे अध्यक्ष सागर बुटे, मुख्याध्यापक योगेश पखाले, मिलन शाह, श्रीपाद मोहोड, दिपक देशपांडे, पवन लढ्ढा, सचिन राजुरकर, कु.चित्रा खोब्रागडे, प्रिती खोडे व अंगणवाडी सेविका उपस्थित होते.

ई-लर्निंग प्रकल्पाच्या माध्यमातून कोरोना परिस्थिती मागील दोन वर्षात विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान भरुन काढण्याचा तसेच **मनोरंजन पध्दतीने अध्यापन करुन विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याकरीता** अश्याप्रकारचे उपक्रम इतर शाळांमध्ये राबविणार असल्याचे उपआयुक्त नरेंद्र वानखडे यांनी आपले मत व्यक्त केले. रोटरी क्लब तर्फे सदर उपक्रमाकरीता **५० टक्के खर्च करण्यात आला असून ५० टक्के खर्च मुख्याध्यापक योगेश पखाले यांनी स्वत: केलेला आहे.** वडाळी शाळेचे

शिक्षक विद्यार्थ्यांकरीता सतत नवनविन उपक्रम राबवित असल्याने त्यांचे अभिनंदन यावेळी शिक्षणाधिकारी डॉ.अब्दुल राजीक यांनी केले.

जागतिक महिला दिना निमित्य शाळेत पार पडलेल्या रांगोळी स्पर्धेचे बक्षिस वितरण यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये समृध्दी इंगोले, राशी राठोड, सृष्टी बाजड, सारिका तांदुळकर, संस्कृती हेमाने, अक्षरा गोफने यांना बक्षिस वितरण करण्यात आले.

शरीराचे अव्ययव, आंतरदिवे, शरीराची रचना, शिवाजी महाराजांचा इतिहास, भौगोलिक घटना, इंग्रजी कविता, सुर्यग्रहण, चंद्रग्रहण, दिवस-रात्र, आकाश गंगा, सुर्यमाला यासारख्या भुगोल, विज्ञान विषयांमधील कठीण संकल्पना यामाध्यमातून आता विद्यार्थ्यांना शिकणे सोपे जाणार आहे.

या कार्यक्रमाचे संचालन प्रियंका हंबर्डे तर आभारप्रदर्शन मनिषा वाकोडे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता सुलोचना डाखोळे, चेतना बोंडे, मोनिका पंधरे, अनिता विधाते, ज्योस्ना खडसे, स्मिता वानखडे, वैशाली देशमुख, प्रणिता देशमुख, अर्चना राऊत, राजकुमार जाधव यांनी अथक परिश्रम घेतले. शाळेच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

स्वातंत्र्याचा

स्वातंत्र्याचा

मनपा मराठी मुलींचे हायस्कूल बुधवारा येथे जागतिक महिला दिन
दिनांक ०९/०३/२०२२

अमरावती प्रतिनिधी,

"आझादी का अमृत महोत्सव" अंतर्गत मनपा मराठी मुलींचे हायस्कूल बुधवारा येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात पार पडला. महिला दिनाचे औचित्य साधून शाळेतील काही माजी विद्यार्थिनी चा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता .त्याकरता कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून मनपा शिक्षणाधिकारी श्री अब्दुल राजिक सर तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षा सौ वैशाली कुऱ्हेकर मॅडम होत्या. सत्कारमूर्ती म्हणून ज्यांना निमंत्रित केले होते त्या म्हणजे विदर्भ महाविद्यालयातील प्राध्यापिका संगीत विभागाच्या प्रमुख सौ पुनम दिवसे मॅडम, नरसम्मा महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ.सौ.राजश्री काशीकर मॅडम अर्थ शास्त्र विभाग प्रमुख, नाट्याभिनयात विशेष प्रावीण्य प्राप्त करणारी विद्यार्थिनी कु.शुभांगी करुले, पोलीस सेवेत कार्यरत असणारी कुमारी अंजू विजयकर आणि वाङमय पारंगत शिक्षण उत्तम गुणांनी उत्तीर्ण होऊन लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करणारी कु. रेखा धुर्वे यांचा सन्माननीय अतिथी मनपा शिक्षण अधिकारी डॉ.श्री .अब्दुल राजिक सर आणि कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ कुऱ्हेकर मॅडम यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्प देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर आमच्या शाळेतील स. शिक्षिका कु वैशाली हिरासिंग परतेकी यांनी १०० दिवस वाचन अभियान अंतर्गत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था तर्फे आयोजित कथाकथन स्पर्धेत विभागीय स्तरावर अमरावती म.न.पा चा सहभाग दर्शविला त्याबद्दल त्यांना सन्मान चिन्ह व पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले कंत्राटी नेमणूक केली असून सुद्धा शाळेत पुर्ण वेळ इयत्ता ९ ते १० ला जबाबदारी पूर्वक गणित आणि विज्ञान शिकवितात अशा कु. अर्चना लिखितकर मॅडम आणि ज्यांच्या मुळे शाळा सदैव स्वच्छ आणि नीटनेटकी राहते अशा आमच्या कार्यतत्पर शिपाई श्रीमती अनिताताई भोजने आणि विद्याताई जटाळे यांचाही

मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. आजादी का अमृत महोत्सव, ऊर्जा संवर्धन सप्ताह, संविधान दिन, गणित दिन अंतर्गत ज्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. शिकण्याची जिद्द असेल तर अशक्य कार्य देखील पूर्ण होऊ शकते हे आपल्या मार्गदर्शनातून मनपा शिक्षण अधिकारी डॉ.श्री.अब्दुल राजिक सर यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. तर सौ. दिवसे मॅडम आणि सौ.काशीकर मॅडम यांनी आपल्या भाषणातून शाळेला हवी ती मदत करण्याची हमी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री रविंद्र सरोदे सर यांनी केले , बक्षीस वितरणाचे सूत्र संचालन कु.अश्विनी विघ्ने मॅडम यांनी केले तर कार्यक्रमाचे संचालन कु. वैशाली परतेकी मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री अमोल औरंगपुरे सर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व शिक्षकवृंद श्री प्रवीण पाटील सर श्री सुनील आसलकर सर श्री रवींद्र सरोदे सर , श्री. अमोल औरंगपूरे सर, कु . अर्चना लिखितकर मॅडम कु. अश्विनी विघ्ने मॅडम तसेच शिक्षकेतर कर्मचारी श्रीमती भोजने ताई, सौ विद्या ताई जटाळे यांचे सहकार्य लाभले. शाळेतील मुख्याध्यापिका सौ वैशाली कुऱ्हेकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडला.

MISSION
CHANDRYAAN - 2
Salute

COLOURS

जागतिक महिला दिना निमित्य चपराशीपुरा येथील मनपा उच्च प्राथमिक मराठी शाळेत विविध कार्यक्रमाचे आयोजन

दिनांक ०८/०३/२०२२

अमरावती प्रतिनिधी,

“आझादी का अमृत महोत्सव” अंतर्गत दिनांक ८ मार्च,२०२२ रोजी जागतिक महिला दिन निमित्य मनपा उच्च प्राथमिक मराठी शाळा क्र.१३ चपराशीपुरा येथे विविध कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख पाहणे मा.डॉ.अनिता बोबडे स्त्रीरोग तज्ञ उपस्थित होते. या कार्यक्रमात

महिला पालक वर्गासाठी रांगोळी स्पर्धा,डिश डेकोरेशन तसेच स्त्री वर आधारीत ध्वनीफीत दाखविण्यात आली.

स्पर्धेत विजेत्यांना डॉ.अनिता बोबडे यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

डॉ.अनिता बोबडे यांनी सांगितले की, जागतिक महिला दिन २०२२ या दिवसाचा मुख्य हेतू महिला सबलीकरण करणे हा आहे. हा दिवस महिलांप्रती आदर, प्रेम व्यक्त करण्याचा आहे. स्त्रीला अनेक नाती जोपासावी लागतात प्रत्येक कुटुंबाचा आधारस्तंभ स्त्रीच असते. स्त्री आपल्या मुलांवर चांगले संस्कार व्हावत म्हणून जीवाचे रान करते. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते. आज प्रत्येक क्षेत्रात प्रगतीपथावर स्त्री आहे. पण तरीही स्त्रियांना अनेक संकटांना सामोरे जावे लागते. आजच्या स्त्रीने आत्मनिर्भर वनले पाहिजे आणि निर्भयपणे संकटांचा सामना केला पाहिजे. कारण पुढची पिढी कशी घडवायची हे महिलांच्याच हातात आहे. त्री सन्मानाची सुरवात आपण आपल्या घरापासून करायला हवी तरच आपला भारत देश सुरक्षित, सक्षम आणि बलवान होईल. यावेळी महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता शाळेच्या मुख्याध्यापिका चित्रा खोब्रागडे, मेटे मॅडम, पटिले मॅडम, सातपुते मॅडम, विहिरे मॅडम, भास्कर मॅडम, प्रविण वानखडे, ऋषभ आठवले यांनी परिश्रम घेतले.

अमरावती महानगरपालिका, अमरावती. महिला व बाल विकास विभाग
जागतिक महिला दिन

जागतिक महिला दिन

जागतिक महिला दिन
2022

जागतिक महिला दिन

जागतिक महिला दिन
2022

अमरावती महानगरपालिका द्वारा जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

अमरावती प्रतिनिधी,

"आझादी का अमृत महोत्सव" अंतर्गत अमरावती महानगरपालिका महिला बाल कल्याण समिती व विभागाद्वारा राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान विभाग सहकार्याने ८ मार्च जागतिक महिला दिन निमित्त विविध कार्यक्रम संत ज्ञानेश्वर, सांस्कृतिक भवन, अमरावती येथे दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आले

होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी मा.महापौर चेतन गावंडे तसेच प्रमुख अतिथी म्हणून उपमहापौर सौ. कुसुम साहु, स्थायी समिती सभापती सचिन रासने, सभागृह नेता तुषार भारतीय, महिला व बाल कल्याण समिती सभापती सौ.माधुरी ठाकरे, उपसभापती सौ.वंदना मडघे तसेच नगरसेविका संध्या टिकले, लविणा हर्षे, जयश्री डहाके, राधा कुरील, निता राऊत, वंदना कंगाले, शोभा शिंदे, अर्चना धामणे, रिता मोकलकर, जयश्री कु-हेकर, सोनाली नाईक, सुरेखा लुंगारे, नुतन भुजाडे, अनिता राज, पद्मजा कौंडण्य, संगीता बुरंगे, रिता पडोळे, मंजुश्री महल्ले, रेखा भुतडा, सपना ठाकुर, नगरसेवक संजय वानरे, अजय सारसकर, आशिष अतकरे, बलदेव बजाज,उपआयुक्त नरेंद्र वानखडे, पर्यावरण संवर्धन अधिकारी महेश देशमुख, सहाय्यक आयुक्त योगेश पिठे, प्राची कचरे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी स्वच्छता डॉ.सिमा नैताम, शिक्षणाधिकारी डॉ.अब्दुल राजीक, उपस्थित होते.

दिपप्रज्वलन करुनच सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक मा.नरेंद्र वानखडे उपआयुक्त तथा महिला बाल विकास अधिकारी यांनी केले. त्यानंतर उपमहापौर कुसुम साहु, महिला बाल कल्याण समिती सभापती माधुरी ठाकरे, सभागृह नेता तुषार भारतीय यांनी मनोगत मांडले. यावेळी भारतरत्न लता मंगेशकर व सिंधुताई सपकाळ यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

त्यानंतर सर्व महिलांकरीता या कार्यक्रमात माझी वसुंधरा अभियान व स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आधारीत रांगोळी व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आले होते.

एन.यु.एल.एम. विभागाचे सहकार्याने महिलांकरीता कर्ज मेळावा व विविध शासकीय योजनांचे माहितीचे स्टॉल आयोजित करण्यात आले होते.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांचा सन्मानपत्र देवून सत्कार करण्यात आला.

महिला बचत गट, आशा वर्कर, मनपा ग्रंथालयाच्या मुलींचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे (समुहगान, नाटीका, एकांकीका व समुहनृत्य) आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात महिलांकरीता असणा-या शासकीय योजनांची माहिती देण्यात आली होती. जागतिक महिला दिना निमित्त अमरावती महानगरपालिकेतर्फे विविध कार्यक्रमामध्ये महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.

महापौर चेतन गावंडे यांनी अध्यक्षीय भाषणा करुन महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा देत या विविध कार्यक्रमास सहभाग घेण्याचे आवाहन करुन या उपक्रमाचे कौतुक केले. ८ मार्चला जागतिक महिला दिनाचे आयोजन केले जाते. यानिमित्ताने विविध क्षेत्रातील महिलांचा योगदानाबाबत त्यांचे कौतुक केले जाते. २१ व्या शतकात महिलेने प्रत्येक क्षेत्रात प्रगती साधली आहे. आर्थिक, शैक्षणिक, तांत्रिक, सामाजिक अशी अनेक क्षेत्रे प्रगतीसह सर केली आहेत. त्यांच्यासाठी हा अभिमानाचाच दिवस आहे. महिलांची प्रत्येक क्षेत्रातली कामगिरी आज उंचवणारी ठरली आहे. कोरोनाच्या काळामध्ये रुग्णांची सेवा करण्यामध्ये महिलांनी योगदान दिले होते. राष्ट्रीय पातळीवर योग्य प्रशिक्षणाच्या आधारे महिला यश मिळवू लागल्या आहेत. निर्णय क्षमताही त्यांची चांगली असून वैयक्तिक पातळीवर आर्थिक दृष्ट्या सक्षमही त्या होवू लागल्या आहेत.

उपमहापौर कुसुम साहु यांनी सांगितले की, स्त्रियांमध्ये जन्मजात धीरोदात्तपणा व शिस्त हे गुण असतात. अडचणीतून मार्ग काढण्याचे कौशल्य असते. कुटूंबाच्या आर्थिक निर्णयात महिलाने सक्रीय सहभाग घेतल्यास कुटूंबाला अर्थ निर्भर होण्यास त्याचा नक्कीच फायदा होतो. महिला दिन हा महिलांकरीता खास दिन म्हणायला हवा. आजच्या महिलांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करायला हवा. त्याकरीता जास्तीत जास्त कष्टही घ्यायला हवेत. इतरांसाठी आपण आदर्श ठरावे अशा प्रकारचे कार्य आजच्या महिलांनी करण्याची गरज आहे. यावेळी महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

सभागृह नेता तुषार भारतीय यांनी सांगितले की, जागतिक महिला दिन हा महिलांचा सन्मान करण्याचा दिवस आहे. विविध क्षेत्रामध्ये दिलेल्या योगदानाचे कौतुक करण्याचा हा महिलांकरीता महत्वाचा दिवस आहे. ८ मार्चचा दिवस प्रत्येक महिलेकरीता प्रेरणादायी असाच ठरतो आहे. सर्व महिलांसाठी हा अभिमानाचा दिवस आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्तरावर महिला अभिमानाने आपली कामगिरी उत्तमपणे पार पाडत आहेत. आपली कामगिरी नित्य उंचावत गरुडभरारी घेण्याच्या दिशेने महिला कार्यरत आहेत. यावेळी महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

महिला बालकल्याण समिती सभापती माधुरी ठाकरे यांनी सांगितले की, समाजातील तळागाळातील होतकरु महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात महिला आघाडीने आघाडी घेतली आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक सबलीकरणाच्या कार्यामध्ये महिला आघाडीने योगदान दिले आहे. शिवणक्लास, मेहेंदी काढणे, ब्युटी पार्लर, रांगोळी, इलेक्ट्रिक माळा तयार करणे, तिळगुळाचे तसेच मोत्याचे दागिने बनविणे, चॉकलेट तयार करणे, कुकींग क्लासेस, लोणची, पापड, चटण्यांची निर्मिती करणे अशा विविध व्यवसायांचे प्रशिक्षण तळागाळातील महिलांना दिले जाते. या आधारे या महिला स्वावलंबी होवून आर्थिक दृष्ट्या सक्षम होतात. आजचं वातावरण हे महिलांसाठी खूप चांगल आहे. कर्ज मिळण्याच्या सहज सुलभतेमुळे अनेक विविध उद्योगांच्या संधी आजमावण्याची संधी महिलांना लाभत आहे. महिलांनी धाडसाने स्वावलंबी होत उद्योग उभारला पाहिजे आणि यायोगे विकास साधला पाहिजे. यावेळी महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला महानगरपालिका महिला बाल विकास विभाग, राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान विभाग सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे संचालन वैष्णवी खोडे यांनी यांनी केले.

स्वयंआधार प्रकल्पाच्या विधवा महिलांनी डिझाईन केलेल्या ड्रेसवर फॅशन शो आयोजित करण्यात आला होता. बडनेरा येथे बेघर निवारा केंद्रातील बेघर महिलांनी सुंदर नृत्याचे सादरीकरण केले. जागतिक महिला दिना निमित्य अनेक रंगारंग कार्यक्रम व मान्यवर महिला मंडळीचा यावेळी सत्कार करण्यात आला.

अमरावती
पालिका, अमरावती
महोत्सव
कार्यशाळा दि.
डॉ. विनय सिन्हा

अमरावती महानगरपालिका, अमरावती

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत माहितीचा अधिकार अधिनियम २००५

विषयी अमरावती महानगरपालिकेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची कार्यशाळा

अमरावती प्रतिनिधी,

माहितीच्या अधिकाराबाबत अमरावती महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी वृंदाला अद्ययावत ज्ञान असावे यादृष्टीने शुक्रवार दिनांक ४ मार्च,२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत माहिती अधिकार अधिनियम, २००५ बाबत प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले होते. या कार्यशाळेत प्रमुख अतिथी म्हणून मा.डॉ.विनय सिन्हा राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ, अमरावती, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.डॉ.प्रवीण आष्टीकर, आयुक्त, महानगरपालिका, अमरावती, मा.ॲड.राजेंद्र पांडे राष्ट्रीय प्रशिक्षक माहिती अधिकारी, कायदा उपस्थित होते. यावेळी मान्यवरांचे शाल, पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देवून व स्वागत करुन कार्यशाळेला सुरुवात करण्यात आली.

महानगरपालिका आयुक्त डॉ.प्रवीण आष्टीकर यांच्या मार्गदर्शनाखाली माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अधिकारी, कर्मचारी वृंदासाठी महानगरपालिका क्षेत्रातील अद्ययावत माहिती मिळण्याच्या दृष्टीने कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत मा.डॉ.विनय सिन्हा राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ, अमरावती, मा.ॲड.राजेंद्र पांडे राष्ट्रीय प्रशिक्षक माहिती अधिकारी, कायदा यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ याबाबत सर्व अधिकारी व कर्मचा-यांना मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेमध्ये माहितीचा अर्थ, माहितीचा अधिकार व कर्तव्ये याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

राज्य माहिती आयुक्त डॉ.विनय सिन्हा यांनी यावेळी सांगितले की, सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामाकाजामध्ये अधिकाअधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने, सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली माहिती नागरिकांना मिळवता यावी म्हणून नागरिकांचा माहिती मिळण्याच्या अधिकाराची व्यवहार शासन पध्दत आखून देण्याकरीता राज्य माहिती आयोग घटीत करण्यात आला आहे. सर्व अधिकारी, कर्मचा-यांनी या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ याचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. या कार्यशाळेतून आपल्याला या कायद्याची माहिती मिळणारच आहे. माहिती कोणती देणे अपेक्षित आहे हे महत्वाचे आहे. कायदा वाचला की तो लक्षात येतो. कायद्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. माहितीचा अर्ज आपल्याकडे प्रलंबित ठेवून उपयोग नाही. कार्यशाळा होणे गरजेचे आहे.

महानगरपालिका आयुक्त डॉ.प्रवीण आष्टीकर यांनी यावेळी सांगितले की, अमरावती महानगरपालिकेचे क्षेत्र व्यापक स्वरुपाचे असून विविध विषयासंबंधी माहिती अधिकार कायद्या अंतर्गत माहिती मिळण्याबाबत विविध ठिकाणाहून नागरिकांकडुन अर्ज महानगरपालिकेला प्राप्त होतात. परंतु अर्जावर ठराविक मुदतीचे आत बरेचदा संबंधीताकडून कार्यवाही केल्या जात नाही व अर्ज प्रलंबित राहतात. या माहितीचा अधिकार अधिनियमाचा अभ्यास व्हावा या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कोणती माहिती देता येते, कोणती माहिती देता येत नाही याचीही माहिती कार्यशाळेतून होणार आहे. कुठली माहिती देणे अपेक्षित आहे हे माहित असणे आवश्यक आहे. शंका असतील ते निरासन करणे आवश्यक आहे. प्रत्येक अधिका-याने व कर्मचा-याने या कार्यशाळेत आपले प्रश्न उपस्थित करुन त्याचे उत्तर घेणे अपेक्षित आहे.

माहिती मागविण्यासाठी अर्ज करणे व अर्ज निकाली काढण्याची प्रक्रिया, माहिती प्रकट करण्याचे अपवाद, अंशत: द्यावयाची व त्रयस्थ पक्षाची माहिती प्रकट करण्याची कार्यपद्धती, माहिती आयुक्त - अधिकार, कार्य व कर्तव्य, प्रथम व द्वितिय अपील, माहिती, वैयक्तिक माहिती, जनहित व त्रयस्थ पक्ष या

संदर्भातील महत्त्वाचे न्याय निवाडे, संकीर्ण कलम २१ ते ३१, जन माहिती अधिकाऱ्यांनी करावयाचा पत्रव्यवहार व विविध प्रकारचे नमुने अशा महत्त्वपूर्ण विषयांबाबत मा.ॲड.राजेंद्र पांडे राष्ट्रीय प्रशिक्षक माहिती अधिकारी, कायदा यांनी मार्गदर्शन केले. या कायद्याकडे सकारात्मकतेने पाहणे गरजेचे आहे असे यावेळी त्यांनी प्रतिपादन केले.

चर्चेव्दारे माहितीचा अधिकार विषयक विविध प्रश्नांचे समाधानकारक निराकरण करण्यात आले. महानगरपालिका आयुक्त डॉ.प्रवीण आष्टीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेचा उपयोग माहितीचा अधिकार याविषयी सकारात्मक दृष्टीकोन वाढीसाठी तसेच सुव्यवस्थित कार्यालयीन कामाकाजासाठी होईल असा विश्वास उपआयुक्त सुरेश पाटील यांनी व्यक्त केला आहे.

या कार्यशाळेत उपआयुक्त सुरेश पाटील, उपआयुक्त नरेंद्र वानखडे, मुख्यलेखापरिक्षक राम चव्हाण, मुख्यलेखाधिकारी हेमंत ठाकरे, सहाय्यक संचालक नगर रचना आशिष उईके, पर्यावरण संवर्धन अधिकारी महेश देशमुख, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त योगेश पिठे, नंदकिशोर तिखिले, प्राची कचरे, भाग्यश्री बोरेकर, तौसिफ काझी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.सिमा नैताम, शिक्षणाधिकारी डॉ.अब्दुल राजीक, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, पशुशल्य चिकीत्सक डॉ.सचिन बोंन्द्रे, कार्यकारी अभियंता २ सुहास चव्हाण, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, समाज विकास अधिकारी धनंजय शिंदे, अतिक्रमण पथक प्रमुख अजय बन्सेले, बाजार व परवाना अधिक्षक उदय चव्हाण, कार्यालय अधिक्षक संजय दारव्हेकर, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यशाळेचे सुत्रसंचालन नगरसचिव मदन तांबेकर यांनी तर आभारप्रदर्शन उपआयुक्त सुरेश पाटील व उपआयुक्त नरेंद्र वानखडे यांनी केले.

“स्वच्छ सर्वेक्षण २०२२” व “आझादी का अमृत महोत्सव” अंतर्गत अमरावती महानगरपालिकेमार्फत प्रभाग क्र.१३ अंबापेठ येथे स्वच्छता अभियान चे आयोजन

अमरावती प्रतिनिधी,

“स्वच्छ सर्वेक्षण २०२२” व “आझादी का अमृत महोत्सव” अंतर्गत आज दिनांक ०५/०४/२०२२ रोजी अमरावती महानगरपालिकेमार्फत प्रभाग क्र.१३ अंबापेठ येथील नेहरु मैदान येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सदर परिसरातील कचरा निर्मूलनाची कार्यवाही करण्यात आली. सदर ठिकाणी कचरा टाकण्यात येत असल्यामुळे या ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. मनुष्यबळाद्वारे सदर ठिकाणी साफ सफाई करण्यात आली. तसेच प्लास्टीक गोळा करण्यात आले.

उपायुक्त डॉ.सिमा नैताम व सहाय्यक आयुक्त नरेंद्र वानखडे यांनी या अभियानात स्वत: कचरा उचलून या भागाची स्वच्छता केली. यावेळी उपायुक्त डॉ.सिमा नैताम यांनी नागरिकांना आवाहन केले की, शहरामध्ये ठिकठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात येत असून यामध्ये आपला सक्रीय सहभाग नोंदवावा. यानंतर रस्त्याच्या बाजूला पडलेल्या कच-याची विल्हेवाट लावण्याचे निर्देशही सर्व सफाई कामगारांना उपायुक्त डॉ.सिमा नैताम यांनी दिले.

यावेळी स्वास्थ अधिक्षक विजय बुरे, स्वच्छ भारत अभियान अमरावती शहर समन्वयक डॉ.श्वेता बोके, स्वास्थ निरीक्षक, सफाई कामगार, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

“स्वच्छ सर्वेक्षण २०२२” व “आझादी का अमृत महोत्सव” अंतर्गत अमरावती महानगरपालिकेमार्फत प्रभाग क्र.२० सुतगिरणी येथे स्वच्छता अभियान चे आयोजन

अमरावती प्रतिनिधी,

प्रभाग क्रमांक २० सुतगिरणी अंतर्गत येणाऱ्या न्यू प्रभात कॉलनी मध्ये “स्वच्छ सर्वेक्षण २०२२” व “आझादी का अमृत महोत्सव” चे औचित्य साधून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने आज दिनांक ०५/०४/२०२२ रोजी स्वच्छता अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यानुसार तेथील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिले आहे. स्वच्छतेप्रति नागरिकांनी जागरूक व्हावे याबाबत उपायुक्त डॉ.सिमा नैताम यांनी नागरिकांना स्वच्छतेप्रति संदेश दिले व नागरिकांनी आपल्या घरी तीन डसबिन ठेवून त्यामध्ये ओला कचरा, सुका कचरा व घातक कचरा हे वेगवेगळा करून कचरा गाडीमध्ये देण्याबाबत आवाहन केले व नागरिकांना या भागामध्ये ओल्या कचऱ्यापासून तयार करण्यात आलेल्या खताचे पॅकेट वाटप करण्यात आले. प्रभागातील कंत्राटदाराकडून पुरविण्यात आलेले एकून ५० नग डस्टबिन चे वाटप करण्यात आले तसेच ज्येष्ठ

नागरिक, स्वच्छता प्रेमी, होम कम्पोस्टिंग याबाबत उत्कृष्ट कार्य करत असलेल्या नागरिकांना प्रमाणपत्र वाटप करून गौरविण्यात आले तसेच नागरिकांचा सहभाग घेऊन स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

प्रभाग क्रमांक २० सूतगिरणीमध्ये नागरिकांच्या घराघरातील ओला व सुका कचरा मिनी टीप्पर गाड्याद्वारे गोळा करून न्यु प्रभात कॉलनी या ठिकाणी खत निर्मिती करण्यात येत आहे. सदर खत संपूर्णपणे तयार झाल्यावर त्याची चाळणी लावून खत काढून घेऊन त्याचे पॅकेट तयार करण्यात आले. यावेळी नागरिकांना सदर खताचे वाटप करण्यात आले. या प्रभागामध्ये रहिवासी असलेले नागरीक श्री.मंगेश आठवले हे घरीच ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून खतनिर्मिती करीत असल्यामुळे त्यांना स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत उत्कृष्ठ कार्याबाबत सन्मानित करण्यात आले. मनपाद्वारे ओल्या कचऱ्यावर खतनिर्मिती करण्याबाबतचा प्रकल्प कार्यान्वित असून शहरातील सर्व नागरिकांनी स्वच्छ भारत अभियानामध्ये सहभागी होऊन आपणही आपल्या घरी ओल्या कचऱ्याची जागीच विल्हेवाट लावून यापासून घरीच खत तयार करावे असे आवाहन महानगरपालिकेद्वारे करण्यात आले. जेणेकरुन नागरिकांना खत निर्मिती करण्याचे प्रोत्साहन मिळून त्यांच्याद्वारे घरोघरी ओल्या कच-यापासुन खत निर्मिती करावी. नागरिकांनी आपल्या घरातील ओला व सुका कचरा वेगवेगळा करुन घंटागाडीमध्ये टाकावे व इतरत्र कचरा फेकू नये. तसेच आपला प्रभाग व शहर स्वच्छ सुंदर व्हावा याकरीता आपण सर्वांनी सहकार्य करावे असे उपायुक्त डॉ.सिमा नैताम यांनी नागरिकांना आवाहन केले.

यावेळी सहाय्यक आयुक्त श्रीरंग तायडे, स्वास्थ अधिक्षक विजय बुरे, स्वच्छ भारत अभियान अमरावती शहर समन्वयक डॉ.श्वेता बोके, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक राजु डीक्याव, स्वास्थ निरीक्षक विनोद टांक, इम्रान खान, सोपान माहुलकर, कंत्राटदार संजय माहुरकर, सतीश माहुरकर, बिटप्यून संदिप डिक्याव, सतीश गोहर, परिसरातील जेष्ठ नागरीक सुभाष गिरी, भाऊरावजी काकडे, हिम्मतराव मुरादे, अनिल भाऊ गोमेकर, अशोकराव गिरी, श्री.जयसिंगपुरे, राजू कळसकर, मंगेश खेडे, श्रीकांत मारोडकर, गजू भाऊ तिडके, श्री.मलनकर, संदीप पोच्छी, गुड्डू गुल्हाने, श्रीमती भारतीताई गुहे, श्रीमती सविता ताई गोमेकर, श्रीमती शिल्पाताई गणेशे, श्रीमती रजनी ताई जयसिंगपुरे, श्रीमती संगीता मोकळंकर, श्रीमती शुभांगी मारोडकर, स्वास्थ निरीक्षक, सफाई कामगार, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

जागतिक आरोग्य दिन व आझादी का अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने अमरावती महानगरपालिकेतर्फे भव्य रॅलीचे आयोजन

अमरावती प्रतिनिधी,

अमरावती महानगरपालिकेतर्फे दिनांक ७ एप्रिल,२०२२ हा दिन जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. आझादी का अमृत महोत्सव व जागतिक आरोग्य दिनानिमित्त अमरावती महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना आरोग्य दिनाचे महत्व पटवून देण्याकरिता अमरावती महानगरपालिकेमार्फत दिनांक ७ एप्रिल,२०२२ रोजी सकाळी ७.०० वाजता जनजागृती रॅली काढण्यात आली. यावेळी सिव्हील सर्जन डॉ.श्री.प्रदिप नरवणे यांनी सदर रॅलीला हिरवी झेंडी देऊन रॅलीची सुरुवात केली.

सदर रॅलीची सुरुवात ही नेहरु मैदान येथून करण्यात आली असून सदर रॅली नेहरु मैदान ते गांधी चौक ते चित्रा चौक ते जयस्तंभ चौक येथून जावून नेहरु मैदान येथे रॅलीची समाप्ती करण्यात आली.

आरोग्यामध्ये केवळ शारीरिकरित्याच नाही तर मानसिकरित्याही तंदुरूस्त असणे गरजेचे आहे. एखादी व्यक्ती जर शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या फिट असेल तर त्या व्यक्तीला निरोगी म्हटलं जातं. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार आरोग्य हे मानवी आनंद आणि कल्याणासाठी मूलभूत आहे. हे आर्थिक प्रगतीसाठी देखील महत्त्वपूर्ण योगदान देते, कारण निरोगी व्यक्ती अधिक काळ आयुष्य आनंदी जगू शकते असे म्हटलं आहे. ७ एप्रिल हा जागतिक आरोग्य दिन (World Health Day) म्हणून साजरा केला जातो. दरवर्षी, जगभरातील लोकांच्या सामान्य आरोग्य आणि कल्याणाविषयी जागरूकता वाढवण्यासाठी जागतिक आरोग्य दिन साजरा केला जातो.

आरोग्यसंदर्भात लक्ष वेधून घेण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेच्या वतीने दरवर्षी आरोग्यासंदर्भात घोषवाक्य प्रसारित करीत असते. "आपली पृथ्वी, आपले आरोग्य" असे या वर्षीचे घोषवाक्य असून त्यानुसार आरोग्य विभागामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

मानवी आरोग्याच्या दृष्टीने या विषयी समाजात जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न केले जातात. शारिरीक आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीने प्रत्येकाने दक्ष असणं गरजेचे आहे त्यामुळे जागतिक आरोग्य दिनाचे विशेष महत्त्व आहे. WHO देखील जागतिक स्तरावर वेगवेगळ्या कार्यक्रमांचं आयोजन करत असतात.

गेल्या दोन वर्षात भारतासह जगभरात कोविड १९ च्या संकटात आपण मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या किती फीट राहणं गरजेचं आहे याचं महत्त्व या रॅलीत जनजागृतीद्वारे सांगण्यात आले. या रॅलीत नागरिकांमध्ये कोव्हीड १९ लसीकरणाबाबत जनजागृती करण्यात आली.

या रॅलीत सिव्हील सर्जन डॉ.श्री.प्रदिप नरवणे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, सहाय्यक आयुक्त नरेंद्र वानखडे, नंदकिशोर तिखिले, शिक्षणाधिकारी डॉ.अब्दुल राजीक, कार्यकारी अभियंता २ सुहास चव्हाण, कार्यालय अधिक्षक संजय दारव्हेकर, अग्निशमन अधिक्षक सैय्यद अनवर, आय.एम.ए. संघटनेचे अध्यक्ष डॉ.दिनेश ठाकरे, आय.एम.ए. सेक्रेटरी डॉ.संदीप दानखेडे, डॉ.विक्रांत राजुरकर, डॉ.जयश्री नांदुरकर, डॉ.देवेंद्र गुल्हाणे, डॉ.अजय जाधव, डॉ.मानसी मुरके, डॉ.प्रतिभा आत्राम, डॉ. संदीप पाटबागे, डॉ.स्वाती कोवे, डॉ.वैशाली मोटघरे, डॉ.राहुल माहुरे, डॉ.फिरोज खान, डॉ.जयदीप देशमुख, डॉ.छाया थोरात, व्यवस्थापक वर्षा गुहे, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, उपअभियंता प्रमोद इंगोले, मारुती सोनोने, विजय खंडारे, आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी, शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

दिनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत भारतीय स्वतंत्रता अमृत महोत्सव उपक्रम खालीलप्रमाणे.

केंद्र शासन पुरस्कृत दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान सुरु आहे. यामध्ये महानगरपालिकेच्या पत्रानुसार आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्ष होत असल्याच्या पार्श्वभुमीवर ५२ आठवड्याच्या कालावधीत आझादी का अमृत महोत्सव साजरा करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेने आराखडा तयार करुन मनपा क्षेत्रातील राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत बचत गटातील महिला करीता मनपाचे विविध उपक्रम तयार करुन त्या राबविण्याच्या सुचना करण्यात आल्या होत्या. त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील सर्वच वस्तीस्तर संघातील बचत गट महिला सहभागी झालेल्या आहेत. त्याप्रमाणे एन.यु.एल.एम. आराखड्यानुसार खालील उपक्रमांचे सादरीकरण केले आहे.

दिनांक २५ ते २६ फेब्रुवारी,२०२२ रोजी आरोग्य भारत कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत दिनांक २७/०२/२०२२ रोजी पल्स पोलिओ लसीकरण मोहीम सर्व वस्तीमध्ये मनपामार्फत घेण्यात येत असल्याने त्यापुर्वी शहरामध्ये बचत गटातील महिलांच्या माध्यमातून, वस्ती संघाच्या माध्यमातून शहरामध्ये जनजागृती करण्याकरीता दिनांक २४/०२/२०२२ व २५/०२/२०२२ रोजी बचत गटातील महिलांची वस्ती निहाय मिरवणूक (रॅली) काढुन जनजागृती करण्यात आली. दिनांक २७/०२/२०२२ रोजी बचत गटातील महिलांनी पोलिओ बुथवर प्रत्यक्ष उपस्थित राहून आशांना डोस देण्यात मदत करणे, वस्तीतील महिलांना त्यांच्या मुलांना पोलिओ डोस देण्यासाठी प्रोत्साहीत करणे, बुथवर गर्दीचे व्यवस्थापन करणे यामध्ये सहभाग दर्शविला.

ऑनलाईन रोजगार मेळावा

जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, अमरावती यांचे सहकार्याने दिनांक २४/०२/२०२२ ते २८/०२/२०२२ या कालावधीमध्ये ऑनलाईन रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आला होता. नंतर सदर मेळाव्याला मुदतवाढ देऊन दिनांक ०३/०३/२०२२ पर्यंत करण्यात आला.

प्रक्रिया सुरुवातीला सर्व आस्थापनामधील एच.आर. यांना भेट देऊन उपलब्ध जागेची माहिती घेण्यात आली. नंतर सर्व आस्थापना यांना ऑनलाईन नोंदणी करण्याच्या सुचना दिल्या व नोंदणी करुन घेण्यात आली.

प्रसिध्दी सादर मेळाव्याची सर्वांना माहिती होण्याच्या दृष्टीने वर्तमान पत्रामध्ये जनसंपर्क अधिकारी यांचे मार्फत प्रेस नोट देण्यात आली. तसेच डिजीटल माध्यमातून प्रसार करण्यात आला.

पुढील प्रक्रीया प्राप्त अर्जाची यादी सदर आस्थापना यांना पाठविण्याची प्रक्रीया जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, अमरावती यांचे सहकार्याने सुरु असून त्यानंतर सदर लाभार्थ्यांना प्रत्यक्ष संपर्क करुन जॉब निश्चिती आस्थापने कडून करण्यात येईल.

सदर मेळाव्याकरीता अमरावती शहरामधील विविध कंपनीचे माध्यमातून २६४ जागा उपलब्ध करण्यात आलेल्या आहे. यामध्ये बंडसन्स अमरावती ३० जागा, वीएचएम एमआयडीसी अमरावती ३० जागा, गोल्डन फायबर अमरावती ५० जागा, ईसीई अमरावती ३० जागा, दव इंडष्ट्रीज एमआयडीसी अमरावती ६४ जागा, Paytm LTD ६० जागा तसेच एकुण २६४ जागा उपलब्ध करण्यात आल्या सदर ऑनलाईन रोजगार मेळावामध्ये जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवार यांनी सहभागी व्हावे याकरीता मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी प्रचार करण्यात आला होता. सदर रोजगार मेळावामध्ये या कंपनीचा सहभाग होता व मोठ्या प्रमाणात प्रशिक्षक व बेरोजगार उमेदवार सहभागी झाले होते. या सर्वांच्या सहकार्याने मेळावा यशस्वीरित्या राबविण्यात आला.

बचत गट करीता कर्ज वितरण मेळावा

दिनांक ०८/०३/२०२२ रोजी जागतिक महिला दिनाचे औचि□त्य साधून भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या निमित्ताने स्थानिक स्वराज्य संस्थांअंतर्गत आयोजित उपक्रमानुसार बचत गटातील महिला करीता विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक भवन, अमरावती येथे करण्यात आले. सदर कार्यक्रमामध्ये सर्व बँकेच्या माध्यमातुन दिनदयाळ अंत्योदय योजना अंतर्गत बचत गटाकरीता बँक कर्ज वितरण मेळावा आयोजित करण्यात आला. त्यामध्ये बँक ऑफ महाराष्ट्र यांनी विविध योजनाचे स्टॉल लावून महिलांना माहिती पुरविणे, तसेच स्वयंरोजगार करीता व बचत गटाकरीता कर्ज वितरीत केले. बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, एच.डी.एफ.सी. बँक, बँक ऑफ बडोदा, विदर्भ कोकण ग्रामिण बँक इत्यादी बँकांनी मोठ्या प्रमाणात स्टॉल व बॅनर लावून सहभाग नोंदविला व महिलांना विविध बँकींग योजनाची माहिती पुरविली तसेच बचत गटांना मोठ्या संख्येने कर्ज वितरण केले. कर्ज वितरण मेळाव्याकरीता जास्त बचत गट, महिला वस्तीस्तर संघ प्राधान्याने पुर्ण वेळ उपस्थित होते. सदर कर्ज मेळाव्यामध्ये सर्व बँकांनी बचत गटांना कर्ज वितरण केले.

सर्व कर्ज मेळाव्यामध्ये कोविड १९ च्या नियमांचे पालन करुन स्वच्छतेबाबत व वसुंधरा संरक्षण बाबत जनजागृती करण्यात आली. अमरावती महानगरपालिकेतर्फे आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत प्रधानमंत्री अन्न प्रक्रीया योजना या योनजेची प्रसिध्दी व प्रसार करण्यात आला. पीपीटी च्या माध्यमातुन विविध योजनांची माहिती देण्यात आली.

दिनांक २२/०३/२०२२ वसुंधरा संरक्षण Epledge प्रशिक्षण

दिनांक ०८/०३/२०२२ रोजी दरम्यान महानगरपालिकेच्या अंतर्गत जनजागृती करीता महिला दिनाचे औचित्य साधुन बचत गटातील महिलांकरीता रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात येवुन वसुंधरा संरक्षण, रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. याकरीता महिलांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला असुन स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत ७० वस्तीस्तर संघ प्रतिनि□धींना व शहर वस्तीस्तर संघ प्रतिनि□धींना दिनांक २२/०३/२०२२ रोजी १.०० दुपारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, महानगरपालिका, अमरावती येथे महिलांच्या मोबाईलद्वारे प्रशिक्षण देऊन प्रात्यक्षिक Epledge करीता नोंदणी करण्यात आली. DAY NULM योजना अंतर्गत सर्व योजनाचे माहिती सविस्तर देण्यात आली.

पीएम स्वनिधी प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजने अंतर्गत सर्व बँक शाखांमध्ये भेटी देवून कर्ज प्रकरणे निकाली काढण्याकरीता बँक व लाभार्थ्यांच्या समन्वय करुन १०/०३/२०२२ पासुन पीएम स्वनिधी कर्ज वितरण कँम्पचे आयोजन

भारतीय स्वतंत्रता अमृत महोत्सव संदर्भात आराखड्यानुसार एनयुएलएम विभागाअंतर्गत प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजने अंतर्गत सर्व बँक शाखांमध्ये भेटी देवून कर्ज प्रकरणे निकाली काढण्याकरीता बँक व लाभार्थ्यांच्या समन्वय करुन १०/०३/२०२२ पासुन पीएम स्वनिधी कर्ज वितरण कँम्पचे आयोजन अंतर्गत सर्व प्रलंबित कर्ज प्रकरणे निकाली काढण्याकरीता तसेच कर्ज वितरणाकरीता सर्व बँक शाखांमध्ये अमरावती महानगरपालिकेच्या माध्यमातून मा.सहाय्यक आयुक्त यांचे मार्गदर्शनाने व्यवस्थापक, सर्व समुह संघटक यांचे माध्यमातुन १०/०३/२०२२ ते १२/०३/२०२२ पर्यंत कँम्प आयोजित करुन कर्ज वितरीत करण्यात आले. संपुर्ण बँक शाखेमध्ये प्रत्यक्ष मनपा कर्मचारी म्हणुन व्यवस्थापक व समुह संघटक यांनी प्रयत्न करुन ६५ लाभार्थ्यांना कर्ज वितरण करुन कार्यवाही करुन घेण्यात आली व यशस्वीरित्या कँम्प संपन्न झाला. यामध्ये विशेषत: ३२६० लाभार्थींना कर्ज वितरण झाले आहे. इंडियन बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडीयन ओव्हरसीस बँक, आय.डी.बी.आय. बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, स्टेट बँक ऑफ इंडिया या सर्व बँकांनी दोन्ही दिवस १०/०३/२०२२ ते १२/०३/२०२२ रोजी आपले योगदान देऊन सहकार्य केले.

जळगावचे महानगरपालिका
विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज

जळगावचे महानगरपालिका

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबे

अमरावती महानगरपालिकेत भव्य रक्तदान शिबीरात मनपा अधिकारी व कर्मचा-यांनी केले रक्तदान

उपायुक्त सुरेश पाटील यांच्यासह अनेकांनी केले रक्तदान

अमरावती प्रतिनिधी,

भारत देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभुमीवर “आझादी का अमृत महोत्सव” साजरा करण्यात येत आहे. अमरावती शहरामध्ये अमरावती महानगरपालिकेतर्फे “आझादी का अमृत महोत्सवाच्या” अनुषंगाने विविध कार्यक्रमाचे आयोजन अमरावती महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. या महोत्सवा अंतर्गत अमरावती महानगरपालिका येथे आज रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अधिका-यांनी, कर्मचा-यांनी व नागरीकांनी रक्तदान शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद देऊन रक्तदान केले. त्यांच्यामार्फत रक्तदानातून एकूण ५१ पिशव्या रक्त संकलित झाले आहे. या शिबीरात उपायुक्त सुरेश पाटील, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, विधी अधिकारी श्रीकांत चव्हाण, अतिक्रमण पथक प्रमुख अजय बन्सेले, शाखा अभियंता दिपक खडेकार, हेमंत महाजन यांच्यासह अनेकांनी रक्तदान केले.

अमरावती महानगरपालिका व रक्तदान समिती अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन आज विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात करण्यात आले होते. यावेळी डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय रक्तपेढीचे रक्तसंकलन डॉ.निकीता तौर, हरीष खान, प्राजक्ता गुल्हाणे, संजय दहीकर, अमित धरने, अमोल तेटू यांनी रक्तसंकलन करण्याची कार्यवाही केली. रक्तदान समितीचे अध्यक्ष महेंद्र भुतडा, सिमेश श्राफ, राकेश ठाकुर, रीतेश व्यास उपस्थित होते.

रुग्णांना अतितात्काळ रक्त उपलब्ध व्हावे त्याअनुषंगाने विशेष रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या होत्या. त्याची अंमलबजावणी म्हणून तातडीचे रक्तदान शिबिर अमरावती महानगरपालिका येथे आयोजित करण्यात आले. रक्तदान शिबिरात रक्तदान करुन अधिकारी, कर्मचारी व नागरीकांनी सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला आहे.

या शिबीरामध्ये विनोद शेंडे, कोमलसिंग अडे, गोलु पाल, गजानन संगोले, सौरभ देशमुख, धिरज पारशिवकर, विशाल पिंपळे, गणेश जाधव, गजानन राठोड, सुनिल यादव, मेहबुब मांजले, फैज अली, अभिजित कु-हेकर, संजय बगाडे, विनोद इंगोले, संजय हरणे, कपिल सारसकर, सुरेंद्र पांडे, गिरीष चव्हाण, संय्यम बावीस्कर, रनजित नरोडे, संदीप चव्हाण, देवेंद्र बायस्कर, पंकज तट्टे, कुशल बोंडे, विलास नकाशे, कमल बनसोड, मंगेश सराफ, श्रीकांत गीरी, प्रदिप मालवीय, दिलीप चौखंडे, राहुल प्रधान, शेखर सोनकांबळे, रुपेश गोलाईत, गजानन खडसे, हर्षद दहातोंडे, नंदन लोहीकरे, निखील बोथे, किशोर मैत्रीवार, पंकज वाघ, गजानन गुजर, अनिकेत कुल्ठे, राजेश गोलाईतकर, गजानन भावे, संजय खडसान, दिपक सरसे या रक्तदात्यांनी रक्तदान केले.

उपायुक्त सुरेश पाटील यांनी सांगितले की, रक्तदान श्रेष्ठ दान आहे हे तुम्हीही वाचलं, ऐकलं असेल. अनेक ठिकाणामधले काही नागरिक या अतुलनीय, श्रेष्ठ दानाचा प्रत्यक्ष अनुभव घेतात. रक्तदान हे आपलं सामाजिक कर्तव्य आहे. रक्तदान हे नि:स्वार्थ भावनेनं केलं पाहिजे. कारण आपल्या एका रक्तदानातून कुणाला तरी जीवदान मिळणार आहे. एक रक्तदाता म्हणून मला सांगायला आवडेल, की रक्तदानासंबंधी जी काही जणांच्या मनात भीती असते ती तुम्ही प्रत्यक्ष रक्तदान केल्यावरच जाऊ शकते. रक्तदानासारखं कोणतंही श्रेष्ठदान नाही. त्याचा आनंद प्रत्येकानं घ्यायला हवा.

यावेळी उपायुक्त डॉ.सिमा नैताम, मुख्यलेखापरिक्षक राम चव्हाण यांनी रक्तदात्याचा प्रमाणपत्र देवून गौरव केला.

शिबीर यशस्वी करण्यासाठी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, डॉ.विक्रांत राजुरकर, डॉ.जयश्री नांदुरकर, पंकज बोरकर व आरोग्य विभागातील कर्मचा-यांनी परिश्रम घेतले.

या शिबीरात सहाय्यक आयुक्त श्रीरंग तायडे, कार्यालय अधिक्षक संजय दारव्हेकर, डॉ.देवेंद्र गुल्हाणे, डॉ.अजय जाधव, डॉ.संदिप पाटबागे, डॉ.मुंदडा, वर्षा गुहे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

अमृत महोत्सव